
# हितगुज





## २०२२ गुढीपाडवा विशेषांक

## मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा

# मराठी मंडळ कमिटी
## २०२०-२०२२

**अध्यक्ष:**
नेहा दामले

**उपाध्यक्ष:**
शिल्पा साठे

**कोषाध्यक्ष:**
मधुजा (नलिनी) पेंडूरकर

**सांस्कृतिक सचिव:**
पारस भेंडे,
देव शिंदे

**संपर्क सचिव:**
अमोल दांडेकर,
सोनाली साठे

**शाळा सचिव:**
समीर पेणकर

**हितगुज संपादिका:**
अमरजा बाबतीवाले
प्रविणा कुलकर्णी-पाठक



**मुखपृष्ठ : कल्याणी कुवळेकर**
**मुखपृष्ठ गुढी : शीतल खटी**
**संपादकीय : प्रविणा कुलकर्णी-पाठक, अमरजा बाबतीवाले**
**कॉलेजकाळातील प्रेम : शिम्पा डोंगरे**
**प्रेम : शिल्पा साठे**
**'प्रेम' अडीच अक्षराचा शब्द : जयश्री प्रमोद मुळे**
**प्रेम : सौ. कल्पना पंचपुत्रे**
**प्रेम : ऋजुता पाथरे**
**सख्या रे : ऋजुता पाथरे**
**L.O.V.E : अमरजा बाबतीवाले**
**रागसंगीत आणि सामान्य श्रोते : सतीश जोशी**
**दिग्गज : डॉ. श्रद्धा कदम**
**माझे मेलबर्न : वासंती मुदकण्णा**
**गाथा smiley ची : रेवा मुळे**
**आयुष्याचे व्हिटॅमिन L : प्राजक्ता हेबळे**
**मराठी शाळा : समीर पेणकर**
**MN-पुणे - स्नेहबंध : सौ. स्वामिनी जीवन बाबतीवाले**
**मेथांबा : अमोल दांडेकर**
**ही सुरेखाSSS... : गौरी सागावकर देशमुख**
**Semantics : अंजिरा मानकर**
**अभिनंदन : मिलिंद सोहोनी**
**शब्दकोडे : सायली अमरापूरकर-जहागिरदार, वर्षा कांडलीकर**



# संपादकीय






प्रविणा कुलकर्णी-पाठक

अमरजा बाबतीवाले


नमस्कार मंडळी,

दिवाळी अंकाला दिलेल्या भरगोस प्रतिसाद बद्दल धन्यवाद. नवीन वर्ष इंग्रजी वर्ष सुरु झाले..आणि वारे वाहू लागले नवीन अंकाचे. नवीन घडामोडी घडल्या आणि माझी सहसंपादिका अमरजा बाबतीवाले हितगुज ला सामील झाली. अमरजा २०१५ पासून मिनेसोटा ची रहिवाशी आणि २०२१ पासून मंडळाची सदस्य आहे. अमरजाचे हितगुज टीम मध्ये मनापासून स्वागत. मराठी नवीन वर्षाच्या सुरवातीला अंक प्रकाशित करण्याचे योजणे झाले पण कोणत्याच विषयाच्या आजूबाजूला मन रुंजी घालत नव्हते..त्यातच लतामंगेशकर , बाबा साहेब पुरंदरे सारखे दिग्गज एकामागोमाग एक असे आपल्याला सोडून चालले होते.. त्यांना शोकाकुल वातावरणात निरोप देताना कळले कि कित्ती प्रेम आहे लोकांचे त्यांच्यावर आणि त्यांच्या कलेवर..बस्स ठरला या वेळेसच विषय प्रेम.. या वेळेचे " हितगुज प्रेमाचे.."

प्रेम ही भावना फक्त राधाकृष्णाच्या प्रेमापुरती मर्यादित नाहीये...ती भावना कधी अवतरते चित्रकाराच्या कुंचल्यातून...कधी मनापासून गायलेल्या गाण्यातून , कधी भेटते आईच्या मायेतून तर कधी आपल्या घरी आणलेल्या पाळीव प्राण्यांकडून...कधी पोहोचते एखाद्याच्या हाताच्या चवीतून..तर कधी चहा कॉफी च्या पहिल्याच घोटातून..कधी येते मित्रमैत्रिणींच्या गप्पांमधून कधी तर तासंतास केलेल्या सरावातून..कधी कोणाच्या लेखणीतून तर कधी निर्मल अंतरंगातून गायलेल्या भजनातून...कधी नवऱ्याने अनपेक्षित आणलेल्या फुलांमधून तर कधी बायकोने मध्यरात्री घातलेल्या पांघरूणातून..किती वेगवेगळ्या छटा...पण भावना एकच..आणि असा विषय असल्यावर प्रतिसाद हि तसा आला..

या अंकात तुम्हाला प्रेमाच्या अनेक छटा वाचायला मिळतील. शिम्पा डोंगरे यांचा कॉलेजकाळातील वेगळ्या प्रेमाची गोष्ट तुम्हाला नक्की आवडेल तसेच प्राजक्ता हेबळे यांचा स्वतःवरच्या प्रेमाबद्दलचा लेख, अमोल दांडेकरांच्या त्यांच्या आवडत्या पदार्थाविषयीचा लेख आणि शिल्पा साठे यांची सुंदर कविता 'प्रेम' असे छान छान साहित्य या अंकात आहे. वासंती मुदकण्णा यांच्या माझे मेलबोर्न या लेखातून तुमची मेलबोर्न ची सहल नक्कीच होईल. आपण नेहमी वापरत असलेल्या smiley विषयी रंजक माहिती आहे गाथा smiley ची या लेखात, तसेच मिनेपोलिस मध्ये राहणाऱ्या मुलांच्या पालकांचा पुण्यातला ग्रुप आयुष्याची सेकंड इंनिग कशी साजरी करत आहे जाणून घ्या MN-पुणे स्नेहबंध लेखात. 'चिमुकल्यांच्या जगात' आणि 'माझी चित्रकला' सदरातले फोटो पण नक्की पहा !! मिलिंद सोहोनी आणि सायली अमरापूरकर यांचे यांचे विशेष अभिनंदन.

प्रेमाच्या विविध रंगांनी नटलेला हा इंद्रधनुषी अंक सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. अंक कसा वाटलं कळवायला विसरू नका.





# कॉलेजकाळातील प्रेम

- शिम्पा डोंगरे

'प्रेम'..... शब्द ऐकूनच भारावतो माणूस! आणि जर ते कॉलेजकाळातील असेल, तर जास्तच उत्सुकता वाढते. Love Triangle असेल तर विचारायलाच नको; दुर्लक्ष करणारे सुद्धा कान टवकारायला लागतात. "अरेरे!", "बापरे, असं झालं!", "बिच्चारा /बिच्चारी !", 'असं व्हायला नको होतं तिच्या /त्याच्या सोबत !", "काय होईल आता त्याचं/ तिचं?", वगैरे,वगैरे... जे त्यात involved असतात , त्यांचं निस्तरलेलं असतं आणि दुनियेचं मात्र विखुरलेलं असतं. असो ! हा विषयच असा आहे; काहींना भुरळ पाडणारा तर काहींना नाराज करणारा.

तर, ही गोष्ट आहे माझ्या कॉलेजच्या 2nd year ची. माझ्या कॉलेजचं नाव Government [गव्हर्नमेंट ] Dental College & Hospital ( GDC & H) , Mumbai आणि समोरच मी राहत असलेली हॉस्टेलची बिल्डिंग. माझा Room No -312. पायऱ्यांच्या बाजूने बघितलं तर डाव्या हाताला, दोन्ही बाजूने मिळून सुरुवातीचे १० रुम सोडून तिसऱ्या मजल्यावर अगदी मधोमध. प्रत्येक रुम ही ३ विद्यार्थ्यांसाठी होती; ३ आलमारी ,(आम्ही जोडून लावलेले ) ३ पलंग, ३ study tablesआणि तीन खुर्च्या. माझी १ roommate शिल्पा मुंबईतच राहणारी, त्यामुळे येऊन -जाऊन राहायची . तर १ जागा अजून रिकामीच होती.

त्यावर्षी एक सिनियर GDC&H ,औरंगाबादहून आमच्या कॉलेजला वर्षभराच्या Internship (इंटर्नशिप) साठी आली होती. ती मुळची पुणेकर ,म्हणून कॉलेज ट्रान्सफर करवून घेतलं होतं. अश्या विद्यार्थ्यांना Extern म्हणायचे. तिचं नाव मयुरी पानसे. आमच्यासाठी मयुरी 'दी'(Di). दिसायला लहानशीच, गोड, कुरळ्या केसांची . खूप हुशार आणि पूर्णपणे माझ्या विरुद्ध ; खूप Extrovert, गिटार वाजवणारी आणि मला १-२ वेळा शिकवण्याचा असफल प्रयत्न करणारी. तसंही गिटार १-२ वेळा मध्ये माझ्यासाठी तरी फक्त strings चे नाव लक्षात राहील एवढं कठीण. तिचं प्राण्यांवर खूपखूप प्रेम. भूतदया तिच्यामध्ये ठेचून भरलेली. आताही ती कॅलिफोर्नियाला Dog Training Coach आहे.

पुण्याला तिच्याकडे एक कुत्रा आणि एक कासव होतं. कुत्र्याला पाहिलं नाही म्हणून नाव आठवत नाही. पण कासव काही महिन्यांनी त्याच्या टाकी सहित हॉस्टेलमध्ये आमच्या रूमच्या एका study table वर विराजमान झालं. नाव- ऑस्कर . हॉस्टेल वर प्राणीपालनाला बंदी होती. खरंतर असतेच. पण Di ने त्याकडे लक्ष दिलं नाही. दर आठवड्याच्या शेवटी ती पुण्याला घरी जायची. ऑस्कर ही सोबत जायचा तिच्या पिशवीत. जाण्या अगोदर ती त्याची टाकी स्वच्छ करून जायची. पण एका आठवड्यात तिला स्वच्छता जमली नाही, तिने ऑस्कर ला पण रूम वरच ठेवलं होतं. आणि टाकीसाफ करायला मला सांगितलं. मला नकोसं वाटत असतांना पण मी ते केलं आणि नवीन पाणी भरून ठेवलं. ऑस्कर शी फार लळा नव्हता मला. पण चालायचं, कारण तो टाकी मध्येच असायचा.

वसतिगृहाच्या तळमजल्यावर उजवीकडे आधी TV रूम , तिथून पुढे लागूनच आमचं कॅन्टीन. TV रूम मुलामुलींसाठी एकच.. कारण इमारत एकच, फक्त पहिल्या मजल्यापासून वर मुले मुली वेगळं म्हणून विभाजनाची भिंत होती.

एकदा मी आणि मयुरी दी दुपारचे जेवण करुन रूम साठी पायऱ्यांकडे जाताना TV रूम मध्ये पोहोचलो. तिथे काही विद्यार्थी TV बघण्यात रमले होते. कुठून तरी "म्याऊ"चा क्षीणसा आवाज आला. आम्हा दोघींचंही आवाजाकडे लक्ष गेलं. भिंतीकडे कोपऱ्यात एक पांढरं मांजरीचं पिल्लू घाबरून बसलेलं होतं. कुठून आलं, केव्हा आलं, कुणाला काही माहित नव्हतं. आम्ही जवळ गेलो. ते पिल्लू दिसायला खूपच घाण! त्याला काही infection झाल्यासारखं वाटत होतं. अंगावरून जागोजागी केस गळून पडले होते. केस उरल्या जागी किडे फिरत होते. पाहून कुणालाही किळस वाटेल आणि तिला हटकण्याऐवजी स्वतःच दूर जाईल अशी तिची अवस्था. पण Di कुठे घाबरते! तिने त्या पिल्लूला उचलून वर रूम मध्ये आणलं. रूम माझीपण असली तरी मी काही बोलले नाही. तसं रूमसाठी काही त्यावेळेला बोलायला पाहिजे असं सुचलंही नाही.

Di ने त्या पिल्लूचं निरीक्षण केलं. तर तिच्या कानातही किडे फिरत होते. ते पिल्लू आता बरं होईपर्यंत आमची रूम, १ बेड share करणार होतं. प्रत्येकाला नाव असतं, तिचंही ठेवायचं होतं. नावही Di नेच सुचवलं. ती पूर्ण पांढरी होती, फक्त एकच करडा डाग तिच्या डाव्या बाजूला पाठपोटाच्या मध्ये होता. म्हणून नाव ठेवलं 'SPOT'. कुणाला सांगितलं तर 'हे कसलं नाव ?' असं म्हणायचे.

माझी सिनियर डॉक्टर रूममेट खूप हुशार आणि प्राण्यांची जाणती असल्याने तिने Spot चे Antibiotic Drops आणि इतर औषधे सुरु केली. पण Spot लहान असल्याने ती पण औषध नको म्हणून हात-पाय मारायची, (actually पाय-पाय मारायची). तिला धरून जबरदस्तीने औषध द्यावी लागायची. माझा प्राणी पाळण्याचा किंवा प्राण्यांच्या इतक्या जवळ येण्याचा प्रसंग पहिलाच आणि बहुदा नख लागतील की काय या भीतीनेही ते काम मी कधी केलं नाही. पण Di ला मदतीची गरज कधी भासलीच नाही. औषध पाजण्याच्या वेळेला तिच्या मानेवर, हातावर Spot नेहमीच ओरबाडायची. पण Spot चे मायबाप झालेली मयुरी दी कधीच मागे हटली नाही.

'Spot ची हळूहळू सवय होऊ लागली होती. ती मोठी होत होती  तशी healthy होऊ लागली होती. तिचं जेवण म्हणजे दूध आणि कुत्र्याचं चित्र असलेलं Pedigree. तिचे केस गळणे कमी होऊन अंगावर नवीन, मऊ केस येऊ लागले होते.

दुसऱ्या वर्षात आम्ही मेणाच्या ब्लॉक वर दात कोरणे (Teeth Carving) शिकायचो. Carving साठी मैत्रिणीसुद्धा रूमवर यायच्या. आम्ही जमिनीवर बसूनच पेपरवर Carvingची सराव करायचो. आम्ही बसलो असतांना Spot फक्त इकडून तिकडे फिरायची. तिचा कुणालाही त्रास व्हायचा नाही. मात्र Hostel Warden ला माहित झाल्यावर तिने कित्येकदा 'तिला बाहेर सोडून या' असं सांगितलं. पण आम्ही तसं केलं नाही.
स्पॉट लहान असताना तिच्या राहण्या-खेळण्यासाठी एक लहान cardboard चा बॉक्स असायचा. जसजशी ती मोठी झाली तसतसा डबाही मोठा होत गेला. डब्यात माती असायची म्हणजे तिने घाण केलं की तिचं ती झाकून ठेवायची. त्याचाच रूमवर वास असायचा. आम्हा दोघींच्याही मेंदूला त्या वासाची सवय झाल्यामुळे दोघींनाही तो नंतर कधी जाणवायचा नाही. पण तिसरी कुणी आली की तिला थोडा वेळ त्रास व्हायचा.
रूमवर मांजर पाळली आहे, ह्याचं इतरांना कौतुक वाटायचं. पण कुणी तिच्या जवळ जात नव्हतं.

Spot वर आम्हा दोघींचंही प्रेम होतं; पण दोघींमध्ये मी Spot ला जास्त आवडायचे. एकतर मी औषध द्यायचे नाही आणि तिची औषध सोडून बाकी काळजी मी घ्यायचे. खेळणं,खाणं माझ्याकडे. त्यामुळे माझ्या रागाने पण तिला काही फरक पडायचा नाही. तिच्या अंगावरचे किडे कमी झाले होते पण पूर्णपणे गेले नव्हते. म्हणून  'Spot ला bed वर येऊ द्यायचं नाही' असं Di मला नेहमीच सांगायची. पण Spot माझं काही ऐकायचं नाही. ती माझ्या आणि मधल्या पलंगावर हमखास यायची. एकदा खूप रागावून मी तिला त्यासाठी काठीनेसुद्धा मारलं. पण ऐकेल तर!!!

दिवसभर Spot रूमवर एकटी असायची. काय करायची माहित नाही. पण मी कॉलेजहून परत येत आहे, हे तिला अगोदरच समजायचं. कसं, हे आजतागायत माझ्यासाठी कोडं आहे. मी कधीही रूमचं दार उघडलं (locked किंवा unlocked ), आणि खाली पाहिलं की ती दाराजवळच असायची आणि दार उघडल्या उघडल्या माझ्या पायाशी फिरायची.  Spotला पहाटे ५लाच भूक लागायची. मी बेड वर सरळ झोपलेली असतांना ती पूर्ण माझं डोकं ते पाय ते डोकं फिरायची. फिरताना तिचं गुलाबी, ओलं नाक मला कुठेतरी लागायचं आणि मला लगेच जाग यायची. मग तिला Pedigree देऊन मी पुन्हा झोपायचे.

असेच दिवस जात होते. ६ महिने उलटलेसुद्धा. Spot इतकी मऊ, गुबगुबीत झाली की कुणी अगोदर तिला पाहिलेलं आता ओळखायचंच नाही. उलट विचारायचे, "तुमच्या रूमवर एक आजारी मांजर होतं, ते कुठे गेलं?" तेव्हा "हीच ती Spot" असं सांगितल्यावर तिला पाहून सर्वांना आश्चर्य वाटायचं.

Spot पूर्ण बरी झाल्यावर तिला Bombay Natural History Society (BNHS) ला द्यायचं होतं. तिकडे तिची पुढची काळजी घेण्यात येणार होती. आम्हा दोघींमध्ये जेव्हा  हे decide झालं, मला माहित  होतं, मी तिला miss करणार होते. Spot ला न्यायचा दिवस उजाडला. कॉलेज झाल्यावर आम्ही तिघी टॅक्सी मधून BNHSला पोहोचलो तर Office Time संपल्यामुळे त्यांनी आम्हाला आठवड्यानंतर यायला सांगितलं. माझ्या खुशीला काही सीमा नव्हती त्यादिवशी. आठवडाभर का होईना Spot पुन्हा सोबत असेल यातच आनंद मानून आम्ही पुन्हा हॉस्टेलला आलो.
आठवड्याने  Spot ला BNHS ला देऊ केलं. त्यानंतर तिचं काय झालं, मी कधीच मयुरी दीला विचारलं नाही. कदाचित  Spot सुद्धा आमची आठवण काढत संध्याकाळी कुठल्या तरी दारावर उभी राहून वाट पाहत असावी; बहुदा 'ते' दार कुठे गेलं शोधत असावी; कदाचित पहाटे ५ ला उठून माझा बेड आणि मला शोधत असावी; कदाचित.....

वर्ष सरलं. मयुरी दी Internship संपवून पुण्याला परतली आणि मी कॉलेजच्या 3rd Year ला गेले. आज ह्या गोष्टीला १९ वर्षे झालीत. त्यावेळेला आत्तासारखा Camera Phone नसल्याने प्रत्येक क्षण काही capture करता येत नव्हता. पण मेंदू, डोळे आणि मनाने capture केलेल्या Spot सोबतच्या सगळ्या क्षणांच्या आठवणी आजही आरश्यासारख्या स्वच्छ आहेत.

म्हणतात ना, प्रेमाला मर्यादा नाही; तशीच भाषाही नाही...




# प्रेम

- शिल्पा साठे

'प्रेम या अडीच अक्षरांची तशी एकच व्याख्या नाही
प्रेम कसं करावं, कुणावर करावं याचे काही नियम सुद्धा नाहीत.
मग असावं कशाला बंधन प्रेमाला कुठल्याही यम नियमांच
जे आवडतं , आनंद देतं , रुजत, फुलतं ते सगळंच प्रेमाचं

कधी आकाशात शुभ्र बगळ्यांची माळ झुलत जाते
खाली तळ्यात तिचं प्रतिबिंब अलगद फुलत जाते
पूर्वेकडच्या डोंगराआडून सूर्यबिंब तेजाळते
हिरव्यागार कुरणांवर सोने शिंपून जाते

केवडा, निशिगंध गुलाब अत्तर शिंपत असतात
गुलाबाचे मनमोहक रंग मन मोहून जातात
उंच उंच वृक्षवल्ली आकाशाशी स्पर्धा करतात
कोमल तरुलता त्यांना बिलगून असतात

कधी एखादा मैत्रीचा हात अलगद हातात येतो
कधी प्रेमाचा नाजूक धागा मनात गुंतत जातो
कधी लेकरू आईला बघून धावत मिठीत जाते
क्वचित एखादे अनोळखी माणूस प्रसंग तारून नेते




पंढरीच्या वारकऱ्यांची भक्ती बघून ऊर भरून येतो
कामात तन्मय झालेला बघितला कोणी की समाधीचा प्रत्यय येतो
निस्वार्थी झटणारे बघितले कोणी की जीवनाचा अर्थ गवसतो
खांद्यावरून देव बऱ्याचदा आपल्याला वाहतो याचाही प्रत्यय येतो

हे सगळे प्रेमाचेच रंग , रूप आणि छटा
कुठल्याही साऱ्या भावात प्रेमाचीच असते गाथा
हे असं सुभग, सुंदर , संपूर्ण प्रेम
आपल्याला नेहमीच भेटत असतं जाता येता
मिळालं कुठे की लगेच घ्यावे ओंजळ भरुन
आणि लगेच वाटून टाकावे निस्वार्थ होऊन

# चिमुकल्या जगात

- काव्या महाशब्दे
भावी नृत्यांगना (भरतनाट्यम)





# प्रेम' अडीच अक्षराचा शब्द

- जयश्री प्रमोद मुळे

'प्रेम' अडीच अक्षराचा शब्द !
त्यात मात्र अगणित, असंख्य भाव भावना आहेत. त्याची व्याप्ती मोठी आहे. प्रेमाला सापेक्षता नसते. प्रेम हे निरालस असते. कोणी कधीही कुठेही आणि कशावरही प्रेम करू शकतं .प्रेमाची परिभाषा अमर्यादित पण निरपेक्ष निःस्वार्थी असते.महत्वाची गोष्ट म्हणजे ही एक आंतरिक ऊर्मी असते. ईथे दोन भिन्न जीवांचे शारीरिकआकर्षणातुन आलेले प्रेम अपेक्षित नसतेच .असतो तो निःस्सीम ,निखळ मनाचा भावाविष्कार!
प्रेम राधेचे श्रीकृष्णावर! मिरेचे श्रीकृष्णावर ! शबरीचे रामावर !
अशा भक्तीयुक्त अद्वैतप्रेमाची गाथा आजही आपण ऐकतो. अनुभवतो.दोन भिन्न लिंगी जीवाला जेंव्हा परस्परांवरील प्रेमाची जाणीव होतै तैंव्हा 'तादात्म्याची विशिष्ट अनुभूती त्यांना मिळते. मग तू ,दूर दूर तेथे , हुरहुर मात्र येथे असे त्यांचे होते.
माणसाला प्रेमाची संवेदनशिलता देवाने बहाल केली आहे त्यामुळे आपण ते व्यक्त करू शकतो.
निसर्गावरील,प्राण्यांवरील प्रेम खूप काही शिकउन जाते. प्रेमाला विविध छटा आहेत राग /अनुरागाची तीथे खेळी आहे.छेड/छाड,मजा/मस्तीचा तीथे मुक्त आविष्कार आहे. प्रणयी जीवांचे मनमुराद बागडणे या प्रेमात आहे. तसेच मातेचे वत्सल प्रेमही तीथे दुथडी भरून वाहते.प्रेमाला अनुरोध नाही. जबरदस्ती नाही. आपसुक आलेली ही सुंदर प्रतीक्रिया आहे. त्यात झोकुन देणे अभिप्रेत आहे.वृध्दापकाळातील स्त्री पुरूषाचे प्रेम हे अद्वैत सांगणारे असते. अव्यक्त भावनांचे असते. म्हणुन जाता जाता म्हणावेसे वाटावे
"या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे" किंवा "'प्रेमा ',काय देउ तुला ? भाग्य दिले तू मला, हदयी वसंत फुलतांना प्रेमास रंग यावे

असे सदाबहार 'प्रेम' प्रत्यैकाला मिळावे.

# चिमुकल्या जगात

- सारा देवधर - भावी मल्ल (Gymnast )





# प्रेम

## - सौ. कल्पना पंचपुत्रे

कविवर्य कुसुमाग्रजांचा जन्म दिन झाला अर्थात मराठी भाषा दिवस आणि मिनेसोटा मराठी मंडळा कडुन प्रेम ह्या विषयावर लिहायचे सांगितले म्हणून कविवर्य कुसुमाग्रजांच्या प्रेम ह्या कविते पासुनच लिहायला सुरुवात करते त्यांच्याच काही मनाला भावलेल्या ओळी....

" प्रेम योगावर कराव , प्रेम भोगावर कराव आणि त्याहुनही अधिक प्रेम त्यागावर कराव".

तर अस हे प्रेम परमेश्वराने जी सृष्टी निर्माण केली तीचा मुळ आधार म्हणजेच प्रेम आणि ह्या प्रेमासाठीच आपण जगत आहोत आणि ह्या प्रेमाला कस जपायचे हे मात्र त्याचे त्यांनी ठरवायचे असते कोणी माझ्या वर प्रेम करा अस म्हणुन कोणी प्रेम नाही करू शकत ते मनातुच असल पाहिजे प्रेमामधे जगायला समजले पाहिजे. प्रेम हा शब्द वापरून गुळगुळीत झाला आहे त्याची व्याख्या करण्या ऐवजी तो अनुभवला पाहिजे.

आपल्या आयुष्यातील कोणत्याही नात्याचा आधार प्रेम आहे आणि ह्या प्रेमाला जपता आले पाहिजे. आयुष्यात कितीही चढ उतार आले तरीही न डगमगता एकमेकांना साथ देणे हे एक प्रेमच आहे . काही दिवसांपूर्वी लता दीदी आपल्या मधे नाही राहिल्या पण त्यांची गाणी आपल्याला प्रेम शिकवुन गेली सकाळी सकाळी आई च्या तोंडुन भुपाळी असो किंवा प्रेमात पडलेल्या प्रत्येकाच्या मनामनातुन त्यांच्या गाण्यातुन त्यांच्या भावना समजून देणे असो प्रेम म्हणजे जखम जी नटोचता भळभळ वहात रहाते प्रेम म्हणजे सुगंध सतत घेऊन सुद्धा मन अतृप्त. हे प्रेमच माणसाला कल्पनाशील बनवत.

ह्या ठिकाणी एक जगदिश खेबुडकर यांचे गीत आठवते "प्रेमाला उपमा नाही हे तर देवाघरचे देणे". खरच आहे. कुठल्याच प्रेमाला उपमा नाही देता येत आई-लेकरांचे, बहिण-भावाचे, देशप्रेम, किंवा प्रियकर-प्रेयसी असो सगळ्याच प्रेमात शुध्दता आहे कुठले कमी किंवा जास्त नाही तितकीच उत्कटता आहे.

मुळात प्रेम एक भावना आहे. समजली तर खुप छान वाटते. अनुभवली तर ती हवी हवीशी वाटते . आणि जपली तर कोणाचा धक्का लागु नये अस वाटत. आणि मोडली तर पुन्हा कधी कोणावर करावीशी वाटत नाही.

# माझी चित्रकला

## - आर्या पाठक





## - श्रवी निवसरकार







# प्रेम

**- ऋजुता पाथरे**

प्रेम हा शब्दच किती व्यापक आहे . त्याची व्याख्या तर त्याहूनही कठीण ! प्रेम म्हणजे नक्की काय ? आपलया आयुष्यात त्याचं स्थान काय ? प्रेमात पडणं , प्रेमात वेडं होण , प्रेमात आंधळं होण , प्रेमाने भीजून चिंब होण असे किती किती प्रकार आपण ऐकतो , पाहतो कधी कधी अनुभवतो सुद्धा ! किती लेखक , गायक , कवी प्रेमाचे गुणगान गातात आणि त्यात प्रेमाचा भंग झाल्यावरच्या अनेक दुःखाने भरलेल्या आर्त विराण्या ! पण हे झाले प्रेमिकांचे प्रेम ! पण आईचे मुलांवरचे प्रेम, मुलांचे बाबांवरचे प्रेम, निसर्गावरचे प्रेम या सगळ्या प्रेमाचे स्थान कुठे असते ? मी स्वतः च्या घरापासून सुरुवात करते. माझी मोठी मुलगी तेव्हा ३-४ वर्षांची होती . इथल्या टी . व्ही वर तेव्हा "Father Knows Best " नावाचा एक फॅमिली शो असे . आमच्याबरोबर बसून तीही तो पाहायची . एक दिवस सकाळी कामाला जाताना "निघतो ग आता " म्हणून तिच्या बाबांनी दरवाजा लावताना म्हटले . ते गेल्यावर हिरमुसल्या घाबऱ्या चेहऱ्यानी मला कमरेला घट्ट मिठी मारून तिने विचारले ,"तुम्ही डिवोर्स घेणार आहात का ?" मी हादरलेच ! म्हटलं ,का असं का विचारतेस ?" त्यावर ती म्हणाली , त्या टी . व्ही वरचा फादर त्याच्या बायकोला "I love you honey म्हणून kiss करतो . माझे वडील तुला कधीच kiss करत नाहीत. तुझ्यावर प्रेम करत नाहीत का ?" मला हसू कोसळलं . माझ्या वेडाबाईला आपल्या दोन्ही संस्कृतीतला फरक सांगितला . प्रत्येक उत्तरावर Why ? हा तिचा प्रश्न असायचाच . माझ्या मनात भावनांचा गोंधळ माजला . आपण प्रेम अध्याहृत धरतो . आपल्याला सतत कुणी ते सांगायची गरज भासत नाही . आपण ते अनुभवतो. आपल्याला ते सर्वांसमक्ष व्यक्त करून दाखवायची गरज वाटत नाही. मग या संस्कृतीत ते प्रदर्शित करण्याची गरज का भासते ? पण कधीतरी त्याने "I love you" म्हटलं,काही कारण नसताना फुल आणला तर मन हुरळून जातच ना ? त्याने क्षणभर का होईना येताजाताना हात पकडला तर गुदगुल्या होतातच ना ? मग आपल्यालकडे भावना दडवून ठेवण्यात पुरुषार्थ का मानतात ? अशा या हिंदोळ्यावर बसून झुलण्यातच वर्षांमागून वर्षे गेली. मुलगी कलेकलेने वाढत गेली. आमच्या लग्नाचा २५व्या वाढदिवसाचा सोहळा साऱ्या मित्रमैत्रिणींनी दणक्यात साजरा केला . माझ्या २० वर्षांची झालेल्या मुलीने आमच्यासाठी एक कविता लिहून वाचली. ती इथेच वाढल्याने तिने English मध्ये लिहिली आहे. मी त्याचे भाषांतर न करता तशीच इथे लिहीत आहे . तिने तिला समजलेल्या प्रेमाचा अर्थ लिहिला आहे-

I look at you and I see today
I have learned what love is in many different ways
This is what all I have seen
Love is being strong, leaving your family
and moving to another country
Love is bringing me in this world,
Love is having hopes when you find out one of your daughters will not have future you have dreamed of,
Love is putting time and efforts in Minu's program
but making sure I was not left out
Love is building house together
Love is opening our home to another (our dog, coco)
Love is making all through my middle school years!
Love is changing plans because I have other things to do
Love is not needing words to know what you mean to each other
Love is mom making sure fat free lunch ready for father
Love is father making sure mom has a ride to whenever she needs to go
Love is letting me know I can do anything I put my mind to
Love is making sure I can make it to this party
Love is not calling each other by name but saying " ए" and "अरे"
Love is what I see growing up with my mom and dad
Love is why we are here today!

**By Anviksha**

आमच्या मुलीला लहानपणी पडलेला प्रश्न तिनेच सोडवला .

प्रेमाच्या किती छटा असू शकतात, जणू इंद्रधनुष्याचे सारे उधळलेले रंग असतात . तारुण्यातील नव्हाळीत गुलाबी प्रेम , निसर्गातल्या प्रत्येक वनश्रीवर होणारे हिरवेगार प्रेम, म्हाताऱ्या आईवडिलांचे आपल्या मुलांवरचे पिकल्या पानासारखा पिवळाजर्द प्रेम, अथांग सागराच्या फेसाळत्या लाटांवर , विस्तारलेल्या आभाळावरचा निळ्या जादूईचं प्रेम , आपल्या तिरंग्यातल्या देशभक्तीचं भगव्या रंगाचं प्रेम , विश्वासात्मक देवावरचं शुद्ध पांढऱ्या रंगाचं प्रेम , वेगवेगळ्या प्राण्यांवर जडलेली माया , हे राखाडी रंगाचं निष्ठेचं प्रेम अशा कितीतरी प्रेमाची अनुभूती प्रत्येक व्यक्तीला कधी ना कधी आयुष्यात होत

असते . कित्तेकदा आपण त्याचा आनंद लुटतो. कित्येकवेळा आपण ते मुद्दाम टाळतो ,दूर पळतो कारण प्रेमात फसवणूक झाली तर वेदना सहन कराव्या लागतात त्याला आपण घाबरतो. आयुष्य कोरडेच राहते . प्रेम कोणत्या का प्रकारचे असेना ते मौल्यवान असतेच. आयुष्याभर प्रेमाविना वैराण जीवनापेक्षा क्षणभरच का होईना प्रेमाचा हिरवळ , तो ओलावा (oasis ) अनुभवणं अधिक महत्वाचे नाही का?
सर्व प्राणिमात्रांवर , चराचरावर , जगावर प्रेम करणारा माणूस खरा श्रीमंत असतो .

आजकाल द्वेष ,राग ,सूडबुद्धी यांनी भरलेल्या जगात एकाच उपाय आहे - प्रेम! अनेक गोष्टी प्रेमाने जिंकता येतात . त्यासाठी सहनशक्ती लागते . आपण साऱ्या मानवजातीवर प्रेम करू लागलो तर कितीतरी हिंसक प्रवृत्ती कमी होतील

## सख्या रे

सख्या रे सख्या रे कसे तुला सांगू
भाव मनीचे माझ्या कसे तुला दावू

पापणीत माझ्या स्वप्न तुझे जागे
कुंकवात माझ्या मूर्त तुझी साजे
ईशकृपेने या कसे ऋण फेडू
सख्या रे सख्या रे कसे तुला सांगू

दिसामागे दिसं किती रे हे गेले
रेशमांचे बंध कसे दृढ झाले
दीर्घायुष्याचे तुझ्या वाण किती मागू
सख्या रे सख्या रे कसे तुला सांगू

मनाचे माझ्या पाखरूही लाजे
तुझ्या अंगणी ते मृदू बोल बोले
जाण हीच भेट अजून काय देऊ
सख्या रे सख्या रे कसे तुला सांगू

मित्रमैत्रिणींचे भाग्य आपणा लाभो
आधार तयांचा असे आयुष्यामागे
व्हॅलेंटाईनला याहून अधिक काय मागू
सख्या रे सख्या रे कसे तुला सांगू
भाव मनीचे माझ्या कसे तुला दावू

**-ऋजुता पाथरे**
**(१९९४ व्हॅलेंटाईनच्या दिवशी )**





काव्यचित्र - कल्याणी कुवळेकर

**मुखपृष्ठकार**



# L.O.V.E


## - अमरजा बाबतीवाले

मॉलमधे फिरणे मला आवडते. नेहमीचा असो किंवा नविन. कधी काही शॉपिंग साठी,कधी उगाच किंवा कधी उगाच शॉपिंग साठी आठवड्यातून एकदातरी मॉलला भेट देणे होतेच.शनिवार रविवार पेक्षा वीक-डे ला दुपारी मॉल मधे किती निवांत वाटते. गर्दी नाही,गडबड नाही,ट्रायल रूम आणि चेकआउट च्या मोठ्ठाल्या रांगा नाहीत.

आज अशीच साप्ताहिक उगाच मॉलची सफर होती. मॉल मधे नेहमीच वेगवेगळी माणसे दिसतात. मॉलच्या शांततेत अभ्यास करायला आलेली मुलं ते न्यू मॉम मीट-अप साठी आपल्या १-२ महिन्याच्या गोंडस बाळांना घेऊन आलेल्या आया.. विंडो शॉपिंग करतात तशी मॉलमधे नुसती माणसं वाचली तरी खुप काही शिकायला मिळते असे मला वाटते.

असेच आज मॉल मधे आलेले बरेच आजी आजोबा पाहिले. एकमेकांच्या मदतीने escalator वर चढणारे, व्हीलचेअर वर बसलेल्या आजींना हौसेने एक एक ड्रेस आणून दाखवणारे आजोबा, लिफ्ट मधून उतरताना नक्की कितवा मजला आहे यांवर चर्चा (वाद) करणारे, Sephora मधे आवडीने मेकअप करून घेणाऱ्या आजी आणि कदाचित त्यांचीच वाट बघत बाहेर बसलेले ते आजोबा, फूड कोर्ट मधे दोघांमधे एकच प्लेट घेऊन खाणारे, Starbucks मधे आजोबांसाठी 2 जास्त कॉफीच्या बिया मागून घेणाऱ्या त्या आजी आणि मॉलच्या बाहेर पडताना एकमेकांना जॅकेट्स घालायला मदत करणारे ते cute आजी आजोबा...
नुसत्या त्यांच्या हालचालीतून दिसणारे त्यांचे एकमेकांवरचे प्रेम मला खुपच गोड वाटले. सगळेच आजी आजोबा सत्तरीचे किंवा त्यापेक्षाही जास्त असतील. -८ च्या थंडीमध्ये एकमेकांना सांभाळत त्याचं मॉल मधे फिरायला येणं, एकमेकांसाठी गोष्टी करणं, आवडी जपणं मला खरंच विशेष वाटलं.

खऱ्या अर्थाने #CoupleGoals म्हणावे असे ते सगळेच आयुष्याच्या अनुभवाने आणि एकमेकांच्या सहवासाने-प्रेमाने समृध्द झालेले young couples मला खूपच आवडले.



# रागसंगीत आणि सामान्य श्रोते

सतीश जोशी

बरेचदा, राग संगीत म्हटले की बरेचसे श्रोते ते आम्ही का ऐकत नाही याचीच कारणे देतात. त्यातील एक प्रमुख कारण म्हणजे "मला रागदारी, रागसंगीत समजत नाही".... पण हे विधान खरे आहे का?
हो. अगदी खरे आहे. वस्तुस्थिती अशी आहे की "मला संगीत समजत नाही" हे वाक्य जास्त बरोबर आहे. आता कसे ते बघुया....

"समजणे" ( म्हणजे समजते असे वाटणे) किंवा "न समजणे" याचा संदर्भ नैसर्गिक अनुभवाशी निगडित आहे . त्यानुसार "मला समजतं" असे वाटणे किंवा "समजत नाही", हे विधान खरे आहे.
सामान्य श्रोते जेव्हा "राग संगीत समजत नाही" असे म्हणतात तेव्हा त्यांना जर विचारले की " मग तुम्हाला जे संगीत आवडते त्यातले काय समजते?" स्वर? ताल/ठेका?, शब्द?

पण या तिघांचीही उत्तरे नकारार्थी असू शकतात. म्हणजे स्वर कळत नाही, ताल किंवा ठेका कळत नाही, भाषा कळत नाही ...... तरीपण ते ऐकावे असे त्यांना वाटते..... कोणतीही चिकित्सा न करता ते त्याचा आनंद उपभोगू शकतात.... म्हणजे त्यांना दुसऱ्या भाषेतील एखादे गाणे गुंगऊन ठेऊ शकते ( शंकराभरणं सारखे).... किंवा शब्दच नसलेले वाद्य संगीत ( उदा. सनई) पण आवडते. म्हणजे आनंद घेण्याकरता ते समजले पाहिजे असे नाही असे वाटायला लागते.... मग खरे कारण काय असावे?

एक तर नाद हा निर्गुण नसला तरी निराकार, अमूर्त असा आहे. म्हणूनच सर्व कलांमध्ये संगीत ही कला कठीण समजली जाते. संगीत या एकाच कलेचा संबंध डोळ्यांशी नसून फक्त कानांवर अवलंबून आहे. त्यामुळे नाद, स्वर समजणे, राग रूप समजणे हे खरे तर संगीत शिकत असलेल्यांना पण कठीण जाऊ शकते. (इतर कलांमध्ये पण अमूर्तता आली की काठिण्य पातळी वाढते. म्हणजे झाडाचे किंवा निसर्गाचे चित्र काढले तर त्यावर प्रतिक्रिया लगेच येऊ शकते, पण एखादे आधुनिक कला दर्शविणारे चित्र असेल तर प्रतिक्रिया यायची शक्यता कमीच. (सामान्यांच्या दृष्टीने ते अबोधच).

आता मुळातच अमूर्त असूनही काही प्रकारचे संगीत नियमित ऐकणारे आणि काही प्रकारचे जाणीवपूर्वक न ऐकणारे हा भेद कशामुळे आहे मग? याची काही प्रमुख कारणे...

१. लय
आपल्या हृदयाचा ठेका आणि लय ही प्रत्येकाला उपजत माहीत असते आणि सगळ्यात ओळखीची. त्यामुळे अशा लयीकडे सामान्य व्यक्ती पटकन आकर्षित होते. इतकेच नाही तर हाताने ती लय पकडू पण शकते आणि इथेच ती आपलीशी वाटते आणि समजल्याची भावना उत्पन्न होते.... "हे मला समजते" असे वाटू लागते....

दुसरीकडे रागाचे स्वरूप, बारकावे दाखवण्याकरता राग संगीतात लय विलंबित (संथ) केली जाते आणि ही विलंबित लय एक अस्वस्थता या श्रोत्यांमध्ये निर्माण करते. त्याला लय आणि सम पकडता येत नाही. म्हणजे आरत्या म्हणताना एकतालात ( न समजता पण) सहज टाळी देणारी मंडळी विलंबित एकतालात मात्र अस्वस्थ होतात. "मला समजत नाही" हे वाक्य या अस्वस्थतेचे निव्वळ शब्दांकन आहे.

लय ही निसर्गात भरून आहे आणि सहज जाणवते. तसेच आवर्तन पण निसर्गाची खासियत असली तरी त्याचे दर्शन देणारा ताल हा मनुष्य निर्मित आहे. या तालाची अनुभूती त्याला निसर्गातून सहज मिळत नसल्यामुळे ती घेणे मुश्किल होऊन जाते....

थोडक्यात लहानपणी जर विविध ताल कानावर पडले तर हे त्या मंडळींना आपलेसे वाटतात. (सुरांची समज पण अश्या घरातील संस्कारांनी सोपी होऊन जाते) पण असे संस्कार नसतील तर विविध ताल शिकण्याला पर्याय दिसत नाही. म्हणजेच राग संगीतात कानसेन व्हायचे असेल तर संगीत शिक्षण आवश्यक आहे.
२. नाद माधुर्य

संगीत श्रवण या प्रक्रियेत महत्वाचे आहे ते म्हणजे माध्यम....तो नाद, तो आवाज आणि त्याचा दर्जा महत्वाचा. कितीही प्रतिभा असली तरी वाद्य (गळा) उत्तम नसेल तर सामान्य लोकांना ते रुचत नाही....

हे वाद्य (गळा) चांगले असले तरी ते पुन्हा कसे हाताळले जाते हे पण महत्वाचे. आकार हा चांगला असला तरी तो कसा लावला आहे याचा नाद माधुर्यावर परिणाम होतोच. आकारा बरोबर इतर स्वर आणि व्यंजने सुद्धा किती चांगल्या पद्धतीनी, भावानुरुप उच्चारली जात आहेत हे पण महत्वाचे. म्हणजेच नादाला भावनेच्या दोऱ्यात ओवल्याशिवाय तो हृदयाला साद कशी घालणार? हे शब्द प्रधान गायकी प्रमाणेच राग संगीताला पण लागू आहे......

३. सादरीकरणाचा उद्देश

शब्द प्रधान गायकी मध्ये "साध्य" शब्द पोचवणे हे आहे आणि संगीत हे "साधन" म्हणून येते. पण राग संगीतात रागाचा आकृतीबंध मांडणे, म्हणजे थोडक्यात संगीत हेच "साध्य" आहे. बंदिशीचे शब्द फक्त "साधन" म्हणून येतात आणि म्हणूनच इथे त्या शब्दांची पुनरावृत्ती होत राहते. (वाद्य संगीतात तर शब्द नसतातच). फक्त शब्द प्रधान गायकी (गीत, गझल इत्यादी) ऐकायची सवय असेल तर श्रोत्याला राग संगीतात "तेच तेच गात आहेत" असे वाटते. पण "तेच तेच" शब्द असतात, स्वर संगती नव्हेत.

४. सादरीकरण

संगीत ही सादरीकरणाची कला (Performing Art) आहे. त्यामुळे सर्व दृष्टीने, सादरीकरण जर चांगले नसेल तर ते संगीत श्रोत्याला आवडणार नाही. मग ते चित्रपट गीत, भावगीत, गझल असो किंवा राग संगीत. त्यामुळे कलाकाराची पण जबाबदारी आहे की सूर, ताल, लय, भाव इत्यादी सर्वांचे भान राखून त्याने गायन, वादन सादर करायचे आहे. फक्त रागाचे व्याकरण गायले तर ते रुक्ष होऊ शकते. स्वर संगती पण त्याच त्याच असतील तर कलाकाराने आत्मपरीक्षण करणे महत्वाचे आहे. इथे कलाकाराची क्षमता, प्रतिभा महत्वाची ठरते. त्यामुळे आपण कोणते संगीत ऐकतोय यापेक्षा ते कोणाकडून ऐकतोय हे पण पहावे. मग नादमाधुर्य राखून, योग्य भाव सांभाळून, रागाचे शास्त्र पाळून, कलाकार कल्पकतेने राग स्वरूप कसे सुरेल आणि लयदार सादर करतो आहे हेच श्रोत्यांनी ऐकायचे आहे.

आता प्रश्न पडतो की मग राग म्हणजे काय? सोपं करून सांगायचं तर राग म्हणजे एक "नादचित्र" आहे. त्यात एक प्रकारची नादाकृती अपेक्षित आहे. हे पथ्य पाळायला लावते ते शास्त्र. पण हे शास्त्र नुसतीच एक चौकट आखून देते असे नव्हे तर त्या चौकटीत मुक्त वावरायची मुभा पण देते.

जसे, आंब्याचे झाड जर रेखांकित करायचे असेल तर त्याची वैशिष्टे कायम ठेऊन चित्र काढणे हे अपेक्षित आहे. ते कसे काढायचे हे तो कलाकार ठरवतो..... म्हणून सर्व कलाकारांची चित्रे वेगळी दिसली तरी त्यातून आंब्याचे झाडच वाटणे हे महत्वाचे. हेच ते शास्त्र. एकच कलाकार सुध्दा प्रत्येक वेळी हे चित्र काढताना वेगवेगळे काढू शकतो, पण आंब्याचेच झाड वाटले पाहिजे हे महत्वाचे (शास्त्र नियम). वस्तुतः हेच कलाकारांकडून अपेक्षित आहे. हीच ती प्रतिभा!

या प्रमाणेच प्रत्येक कलाकाराचा "यमन" हा त्या रागाची चौकट सांभाळून वेगळा वाटला पाहिजे तरच तोच राग अनेक कलाकारांकडून ऐकायला श्रोते येतील....

असो....

पंडित बी. आर. देवधर म्हणतात त्या प्रमाणे कलाकारांसारख्या श्रोत्यांच्या पण पातळ्या असतात..

एका पातळीचे श्रोते फक्त लयीचा आनंद घेऊ शकतात....त्यानंतर काही लयी बरोबर त्यातील शब्दांचा आनंद पण घेऊ शकतात....त्यानंतर या दोघांबरोबर सुरांचा आनंद घेणारे....आणि नंतर नुसत्या सुरांचा ( एका अंतर्गत लयीत) पण आनंद घेऊ शकणारे...

श्रोत्यांची जबाबदारी

थोडक्यात राग संगीताचा आनंद घ्यायचा असेल, आनंदाची पातळी वाढवायची असेल तर श्रोत्यांना पण थोड्या परिश्रमाची आवश्यकता आहे. त्याची सुरुवात हळू हळू खालील प्रकारे करता येईल

सुरवातीला आपल्या आवडत्या वाद्यावर किंवा आवडत्या गायक / गायिकेने सादर केलेली, मध्य लयीतील एका रागातील बंदिश ऐकण्यास सुरुवात करावी. नंतर इतर कलाकारांकडून पण हाच राग मध्य लयीत ऐकावा.
मग त्याच रागावर आधारित काही चित्रपट गीते, नाट्य गीते, गझल इत्यादी आपल्याला आवडणारे प्रकार ऐकावेत.

याबरोबरच समांतर रित्या प्राथमिक संगीत शिक्षण घ्यावे. इथे तानसेन नव्हे तर कानसेन व्हायचे आहे हे लक्षात ठेऊन प्रवास चालू ठेवायचा आहे. आपल्या जाणिवेच्या कक्षा रूंदावणे हेच साध्य आहे हे लक्षात ठेवावे. म्हणून शिकताना भर हा स्वरांची ओळख करून घेणे, तसेच ताल, ठेके शिकणे यावर देणे गरजेचे आहे. यामुळे विलंबित ठेक्यावर पण लय पकडणे सहज होऊन जाते. एखादे गाणे ऐकताना त्यातील ताल, सूर ओळखायचा प्रयत्न करावा. या विषयावरील पुस्तके वाचावीत. ( "नादयात्रा" हे श्री. अशोक श्री. रानडे यांचे पुस्तक छान आहे) जमल्यास या क्षेत्रामध्ये जाणकारी असलेल्या एखाद्या मित्र किंवा मैत्रिणीच्या संपर्कात रहावे आणि शंका दूर कराव्यात.

या नंतरच्या टप्प्यात आधी ऐकलेले राग विलंबित ठेक्या मध्ये ऐकावेत. बारकाईने राग आणि ठेका यांचा आकृतीबंध अनुभवावा. कालांतराने अनेक राग आणि ठेके मनावर कोरले जातात आणि सामान्य श्रोत्याचे प्रगल्भ श्रोत्यात रूपांतर होते.

राग संगीताचा आनंद घेताना नादगुणाबरोबरच, प्रत्येक रागाचे वेगळेपण टिपणे आणि उस्फुर्त दाद देणे अपेक्षित आहे. असा श्रोता मग संगीत नीट ऐकून योग्य जागी दाद देऊ लागतो. ही दाद कलाकाराला प्रोत्साहन देते आणि त्याच्या प्रयोगशीलतेला, प्रतिभेला चालना मिळते आणि कलेची पातळी उंचावते...



# माझी चित्रकला

- अंजली भुरे









# दिग्गज

## - डॉ. श्रद्धा कदम

6 वि किंवा 7 वि मध्ये असेन मी ,आम्हा सगळ्या मुलींना मधल्या सुट्टीनंतर शाळेच्या सभागृहात बोलावण्यात आलं .आमच्यासाठी सभागृहात बोलावलं आहे म्हणजे पर्वणीच असायची .एक तर मधल्या सुट्टीनंतरचे तास व्हायचे नाहीत आणि त्यात ज्यांनी गृहपाठ केला नाही आणि आता शिक्षा होईल असं वाटणाऱ्यांसाठी सगळं 'सोन्याहुन पिवळं 'होऊन जायच .सभागृहात आम्हाला वेगवेगळ्या पाहुण्यांची भाषण ऐकायला मिळायची ,कुणाच्या कविता ,तर कुणाचे सुप्रसिद्ध असलेले लेख या बद्दल आम्हाला माहिती मिळायची .कुणीतरी प्रसिद्ध व्यक्तिमत्व आम्हाला शाळेच्या पटांगणात किंवा सभागृहात आमच्या नेहमी भेटीला येत .त्या किती थोर व्यक्ती आहेत हे कुणीतरी एक शिक्षक येऊन त्यांच्या भाषणात आपल्या परीने आम्हाला समजावून सांगायचे.आमच्या बालमनाला पटत तस आणि तेवढच आम्ही जतन करायचो .काही मुली मागे बसुन डुलक्या घ्यायच्या .काहींना त्या मुळे अचानक पाठीवर रट्टे पण पडायचे .मग त्या मुली कधी झोपायची हिम्मत करायच्या नाहीत .मला मात्र भाषणापेक्षा भाषण संपल्यावर जोरजोरात 1,2,3 अश्या तालात टाळ्या वाजवण्याची खुप हौस !अशी एकंदरीत सभागृहात बोलावण्याची मज्जा !!त्या दिवशी आम्हाला सभागृहात बोलावलं तेव्हा कुणीतरी पाहुणे आज आपल्या भेटीला येणार हे नक्की होत .आमचा कोलाहल शिक्षकांच्या येण्याने थांबला .पाठोपाठ एक आजीच्या वयाच्या बाई नऊवारी काष्टा आणि डोक्यावर पदर सावरत आत आल्या .त्यांच्या बरोबर आणखी 2,3 व्यक्ती होत्या ..नंतर कळलं ती त्यांची मुल होती ...शिक्षकांची प्रस्तावना संपली ,त्यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली ,त्या आजी सारख्या दिसणाऱ्या बाई उठल्या ,डोक्यावरचा पदर सावरत मायिकजवळ आल्या आणि म्हणाल्या "चिमण्यांनो ,जेवलात का??"त्यांच्या एका वाक्याने आम्ही त्यांच्याशी थेट कनेक्ट झालो ..त्यांच्या आयुष्याबद्दल आणि करत असलेल्या कामाबद्दल त्यांनी माहिती सांगितली ..बोलल्या "बाळांनो तुमच्या सारखीच माझी पण बाळं आहेत ,माझी घरी वाट पाहत आहेत ."आणि जात जात त्यांनी आमच्या सगळ्यांसमोर मदतीचा पदर पुढे केला ...शिक्षकांनी जमेल तशी मदत केली .मी धावत पळत वर्गात गेले .पुस्तकांच्या कप्प्यात ठेवलेले होते न्हवते तेवढे (70 rs ) घेऊन त्यांच्या झोळीत ठेवले ...खुप भारी वाटत होत ...आपण कुणाला तरी मदत करू शकतो आणि करत आहोत ती भावना 7,8 विच्या विद्यार्थिनींच्या मनात निर्माण करण्याची ताकत त्या प्रगल्भ व्यक्तिमत्वाने केली होती..नंतर कळायला लागलं तेव्हा कळलं कि ती व्यक्ती म्हणजे "सिंधुताई सपकाळ "होत्या ... त्यानंतर त्यांच्याबद्दल बरच वाचुन आणि माहिती काढुन झाली ..त्या अनाथमुलांसाठी करत असलेले काम आणि त्या साठी घेत असलेले कष्ट याची तुलना कशाशीही शक्य नाही.घेणाऱ्याने घेत जावे ,देणाऱ्याने देत जावे ,घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे ..हि पंक्ती त्यांना तंतोतंत बसते ...

आमच्या शाळेचं स्नेहसंमेलन सोलापुरच्या प्रसिद्ध 'हुतात्मा स्मृती मंदिरात व्हायचं ..या वर्षीही तिथेच होत ...मी 5 वित होते .आम्ही शाळेच्या गणवेशाव्यतिरिक्त आपल्या आवडीचे कपडे घालायला मिळणार म्हणुन खुश होतो ..कार्यक्रमांना सुरवात झाली ,प्रमुख पाहुणे या वेळी होते "डॉक्टर बाबासाहेब पुरंदरे "ते भाषणासाठी उभे राहिले ,कपाळी टिळा ,मिशा आणि लखलखती कांती ,जवळ पास 3000ते 4000 असलेला सगळा प्रेक्षक वर्ग चिडीचुप शांत होता ...मायिकच्या डेस्क वर त्यांनी येताच 'शिवबा"म्हणत जोरात थाप मारली ...आणि त्या शब्दाबरोबर माझ्या मनात रुतले ..ज्या ज्या वेळी ते शिवबा बोलायचे त्यांचे डोळे सूर्यप्रकाशासारखे लक्ख चमकायचे ...नंतर खुप वाचल मी शिवबाबद्दल पण बाबासाहेबांच्या तोंडुन पडलेले शिवबा हे शब्द विलक्षण अद्भुत होते ..खर तर मला माझ्या शाळेचे आभार मानायचे आहेत ,त्यांनी माई व बाबासाहेबांसारख्या व्यक्तींचा परिचय आम्हाला करून दिला ..आमच्य शाळेने 'इतक्या छोट्या मुलींना हि माणसं कळतील ??,असं वाटुन त्यांना बोलावलंच नसत तर कदाचित त्या वयात माझ्या सारख्या अनेकांच्या मनात करुणा ,एकनिष्ठा ,प्रेम,दया या भावना रुजायला वेळ लागला असता किंवा रुजली नसती ....मला वाटत सगळ्याच शाळांनी अश्या थोर ,कर्तृत्ववान माणसांना विद्यार्थ्यांच्या भेटीला आणायला हवं .त्यावयात त्यांना त्या थोर व्यक्तींचं कार्य कळणार नाही कदाचित पण त्याची काही शिकवण किंवा आठवण ते आयुष्यभर गाठीशी ठेवतील .आणि कदाचित भविष्यात परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होईल ...







# माझे मेलबर्न

- वासंती मुदकण्णा

मेलबर्नमधे पाऊल टाकताच मी ह्या गावाच्या प्रेमात पडले. नाही, हे बरोबर नाही. मेलबर्नमधे पाऊल टाकायच्या आधी विमानातून खाली पाहताच पावसाळी ढगांबरोबर लपंडाव खेळणारं गाव माझ्या नजरेत भरलं आणि मी त्याची कधी होऊन गेले हे कळलंच नाही. आणि हो, मेलबर्नला 'गावा' पेक्षा 'शहर' ही उपाधी जास्त शोभते. 'गाव' ह्या शब्दावरून आठवलं. माझी आई हिंदी शिकली नव्हती. पण 'काय आहे त्या हिंदीत' ह्या मराठी बाण्याने अमराठी लोकांशी पिंपरीत बिनदिक्कत हिंदीत बोलायची. उदाहरणार्थ 'हम गावको जानेवाले है' म्हणजे 'आम्ही गावाला जाणार आहोत', किंवा 'हमारे नातेवाईक गावसे आनेवाले है' असं बरंच काही. हिंदीत 'गाव' म्हणजे खेडेगाव. आता मराठीत 'आम्ही शहराला जाणार आहे' असे कोणी म्हणत नाही. खरं म्हणजे आई हिंदी बोलण्याचा प्रयत्न तरी करायची पण शेजारच्या बायका वीसवीस वर्षं पुण्यात राहून मराठी शिकायच्या नाहीत आणि आई असं काही चुकीचं म्हणाली की एकमेकांकडे पाहून हसायच्या. मग मी एकदा त्यांना मराठी आणि हिंदीतील फरक समजावून सांगितलं - अगदी आईच्या मराठी बाण्याने! असो.

मी परदेशात स्थायिक झालेल्या लोकांना नेहमी विचारते की त्यांना अमेरिकेतलं कुठलं शहर सर्वात जास्त आवडतं आणि प्रत्येकजण न चुकता परदेशातल्या आपल्या पहिल्या शहराचे नाव घेतो. कदाचित म्हणूनच मेलबर्न हे माझ्या मनात इतकी वर्षं झाली तरी अजून वसलेलं आहे. पाश्चिमात्य राहणीमान कसे असते आणि त्यांचे जीवन किती सुंदर आणि सोपे असते हे मला आयुष्यात पहिल्यांदा मेलबर्नमधे दिसले. फ्लॅट भाड्याने घेणे, नवीन टेलिफोन कनेक्शन घेणे, गाडी खरेदी करणे आणि मुलगी असून अगदी बिनधास्तपणे जगणे हे सगळे मला नवीन होते आणि ह्या सगळ्या गोष्टींचा कैफ मला कधी चढला हे समजलेच नाही! इथेच मी पहिल्यांदा प्रेमात पडले. पुलंच्या भाषेत इथेच मला अनेक व्यक्ती आणि वल्लींची ओळख झाली. इथेच मी एक परिपूर्ण व्यक्ती बनले. पुण्यानं मला पुस्तकी ज्ञान दिलं पण मेलबर्ननं मला बेभानपणे आयुष्य कसं जगायचं हे शिकवलं.

एकटी राहत असल्यामुळे एकाकीपणा म्हणजे काय हे मला पहिल्या सहा महिन्यातच जाणवले. लोकलनं घरी येताना मी एकदा एका अनोळखी मुलीशी स्वतःहून बोलू लागले आणि काही क्षणातच मी तिला घरी जेवायचे आमंत्रण दिले! तरी बरे ती नको म्हणाली! एकाकीपण कमी कसा करायचा हे पण मी इथेच शिकले. आधी लोकल ट्रेननं आणि नंतर गाडी घेतल्यावर मेलबर्न आणि जवळपासचा प्रदेश अगदी इंचइंच लढवला. मेलबर्नच्या सी.बी.डी. मधे म्हणजेच डाउनटाउनमधे सुरवातीचे अनेक शनिवार-रविवार घालवले. यारा नदीवर अनेक संध्याकाळी एमाच्या नजरेखाली नाव वल्हवली. दोन्ही बाजूंनी सी.बी.डी.तल्या उंच इमारती, फिरायला आलेले लोक, नदीकिनारी असलेल्या उपहारगृहात खाद्य आणि मद्य यांच्या सहाय्याने होणाऱ्या गप्पागोष्टी आणि हास्यकल्लोळ; आणि मी नदीवर अगदी विलासीपणे लयीत वल्ही ओढणारी! जणू काही हे दृश्य आणि ही वेळ माझ्याच करता कुणीतरी तयार केली होती.

इथेच मला हरेकृष्ण मंडळींची ओळख झाली. एकदा शनिवारी सकाळी मी फ्लिंडर्स स्ट्रीट स्टेशनवर लोकलमधून उतरले आणि स्वान्स्टन स्ट्रीट वर चालू लागले. हे स्टेशन म्हणजे मुंबईच्या व्हिक्टोरिया टर्मिनस सारखं. अनेक दिशांनी इथे गाड्या येतात. एकदम रस्त्याच्या डाव्या बाजूच्या एका छोट्याश्या दारातून भगवे कपडे घातलेली चारपाच माणसं बाहेर पडली. तीन गोरे मध्यमवयीन पुरुष आणि दोन गोऱ्या तरुणी दारासमोर हरेकृष्णा हरेरामाचा जप करत जागीच टाळ वाजवत नाचू लागली. मी पाहतच राहिले. काही वेळाने त्यांची वारी हळूहळू पुढे सरकू लागली. रस्त्यावरचे लोक कबड्डी खेळल्यासारखे त्यांना टाळत पदपथावरून येत-जात होते. एका तरुणीने भगवी साडी नेसली होती. सगळ्या पुरुषांनी भगवी धोतरं नेसली होती. मला सोडले तर कोणीच त्यांच्याकडे लक्ष देत नव्हते. पण त्या पाच जणांना कोणाचीच तमा नव्हती. ते आपल्याच तंद्रीत मग्न झाले होते. नंतर कधीतरी रेणूने म्हणजे माझ्या मैत्रिणीने मला विचारले, "आम्ही उद्या हरेकृष्ण मंदिरात पूजेला जाणार आहोत. तू येणार का?" सकाळी दहाला आम्ही मंदिरात पोचलो. मंदिर मंदिरासारखेच होते. आवारात एक मोठं झाड होतं. एका बाजूला स्वयंपाकघर होतं आणि आवाराच्या दुसऱ्या बाजूला एक छोटी खोली म्हणजे टॉयलेट होतं. पूजेला अजून वेळ होता म्हणून आम्ही झाडाखाली गप्पा मारत बसलो. रेणू मला म्हणाली, "तुला एक गंमत सांगू का?" मी मान डोलावताच ती माझ्या कानात कुजबुजली, "तुला इथलं टॉयलेट बघायचं आहे का?" मी म्हटलं, "नाही, मला जायची गरज नाहीये". रेणूला आता हसू आवरेना. "अगं, कमोड भगव्या रंगाचा आहे". मी पण हसले. मग होमाची वेळ झाली म्हणून आम्ही आत गेलो. पुजारी एक गोरा ऑस्ट्रेलियन होता. सुटलेल्या पोटाखाली भगवे धोतर बांधले होते. वर उघडाच होता. त्याने पूजा सांगितली आणि मग आम्ही जेवायला गेलो. वाढप्यांमधे एक भारतीय तरुण होता. रेणू म्हणाली, "हा इंजिनिअर म्हणून भारतातून ऑस्ट्रेलियात आला आणि काही वर्षांनी नोकरी सोडून इथेच देवळात राहू लागला". सगळा स्वयंपाक भारतीय होता आणि सगळं साजूक तुपात केलेलं होतं पण चव काहीतरी वेगळीच होती!

इथेच मी पहिल्यांदा माऊंट बुलरवर बर्फ पाहिला आणि ट्युलिपची बाग ही. इथेच मी पहिल्यांदा पेंगविन पाहिले. फिलिप आयलंड वर रोज संध्याकाळी लहानसे पेंगविन पक्षी आपला दिवसभरचा कार्यभार संपवून समुद्रातून हलत-डुलत किनाऱ्यावरील आपल्या घरट्यांकडे परत येतात. त्यांचे लगबगीने चालणे अगदी माणसांसारखे दिसते, जणू काही दिवसभर काम करून लोक घाईघाईने घरी येताहेत असे वाटते. एका बाजूला

एकदम जोरात आवाज ऐकू येऊ लागला म्हणून प्रेक्षकांचा लोंढा बांधावरच्या एका कोपऱ्यावरून आवाजाच्या दिशेने धावू लागला आणि तिथे जे दृश्य नजरेस पडलं ते आजही माझ्या डोळ्यांसमोर उभे राहते - वाळूत समुद्राच्या भरतीओहोटी मुळे झालेल्या छोट्याछोट्या नाल्यांच्या बाजूला अनेक घरटी होती. त्यातल्या एका घरट्यासमोर जोरजोरात भांडण चालले होते. घरट्याच्या दाराशी एक पेंगविन उभा होता आणि आत एक पेंगविन दिसत होता. त्याच्या समोर दोन पेंगविन उभे होते. हे दोघं बहुतेक नवरा-बायको असावेत. तिघेही तारस्वरात ओरडत होते. त्यांचे 'हे घरटे तुझे का माझे' ह्या वरून भांडण चालू होते! काही क्षण ते पक्षी आहेत हे आम्ही विसरलो कारण ते अगदी माणसांसारखे भांडत होते! भाषा वेगळी होती पण संदर्भ लागत होता!

दर वर्षी मार्चमधे इथे मूम्बा नावाचा उत्सव यारा नदीच्या किनारी साजरा केला जातो. मूम्बा परेडमधली एक घटना आजही माझ्या लक्षात आहे. आम्ही सकाळपासून रस्त्याच्या कडेला बसलो होतो. परेडमधे नेहमीचेच प्रकार होते. मग एक सजवलेली घोडागाडी आली. त्या घोडागाडीत काय होते हे आता आठवत नाही पण गाडीच्या मागे दोन स्काऊटचा खाकी पोशाख केलेली दोन मुलं रस्त्यावर पडणारे घोड्यांचे शेण फावड्याने उचलून एक ढकलगाडीत घालत होते. काय! घोड्याच्या शेणाकरता खास सोय! इथंली स्वच्छता पाहून मी फारच प्रभावित झाले!

एक दिवस ऑफिसात मला सांगण्यात आलं की नोव्हेंबरच्या पहिल्या मंगळवारी मेलबर्न कप डे असल्यामुळे सुट्टी आहे. मी अर्थातच फ्लेमिंगटन रेसकोर्सवर गेले. शर्यती दुपारी तीनला सुरु होतात आणि ऑस्ट्रेलिया आणि न्यू झीलंड हे दोन्ही देश ह्या वेळी अक्षरशः बंद पडतात! स्त्री आणि पुरुषांच्या सर्वोत्तम पोशाखांकरता बक्षिसे असतात. बायका खास टोप्या घालतात. मी बिचारी जीन्स घालून गेले होते आणि माझ्या अवतीभवती छानछान कपडे घालून आलेले लोक होते. मग एकदम 'ती पहा, ती पहा'चा कल्लोळ झाला आणि लोकांच्या झुंडीबरोबर मी ही ओढली गेले. शेजारच्या बाईला विचारलं की काय भानगड आहे तर ती म्हणाली 'तिकडे बघ, ती बाई दिसते आहे ना? ती फर्गि आहे!' फर्गि! ही कोण, असा विचार करताकरता एकदम लक्षात आलं की ही सेरा फर्गसन, प्रिन्स अँड्रूची बायको! मुख्य शर्यत पाहायला गेले पण घोडे इतक्या जोरात धावत होते की समोरून वावटळ गेल्यासारखे वाटले! आणि घोड्यांवर पैसे लावायची हिम्मत झाली नाही!

एक दिवस ऑफिसात माझ्या टेल्कोतल्या बॉसचा म्हणजे सुब्रमण्यमचा फोन आला. तो सिडनीत राहायचा. म्हणाला, "आज संध्याकाळी लायगॉन स्ट्रीटवर पीझ्झा-बाय-द-मीटर ह्या रेस्टरॉंटमधे ये. मी टेल्कोतल्या आजी आणि माजी कर्मचाऱ्यांना बोलावले आहे". लायगॉन स्ट्रीट मेलबर्नच्या लिटल इटलीत आहे म्हणून इटालियन रेस्टरॉंट करता प्रसिद्ध आहे. संध्याकाळी सगळी मंडळी पीझ्झा-बाय-द-मीटरमधे जमली आणि हिंदी-मराठी-इंग्लिशच्या गजबजाटात आपण पिंपरीतल्या टेल्कोत असल्याचा भास झाला. इथे छोटा, मध्यम, किंवा मोठा पीझ्झा मागवता येत नाही - मीटरच्या मापात मागवावा लागतो. पीझ्झा लांब असल्यामुळे प्रत्येक छोट्या भागात वेगवेगळी 'टॉपिंग' मागवता येतात. आमचे टेबलही पीझ्झाप्रमाणेच लांबलचक होते.

पॅरलल पार्किंगचा सराव करण्यासाठी दोन गाड्या लागतात. पण कोण आपली गाडी असल्या 'सरावा'साठी खुशीने देईल? धक्का लागला तर? ड्रायव्हिंग स्कूलमधे खांब वापरतात पण असले खांब आणायचे कुठून? बराच विचार केल्यावर मला एक कल्पना सुचली. मी सरळ एका रोपवाटिकेत गेले आणि दोन कुंड्या आणि रोपांना आधार म्हणून वापरण्यात येणाऱ्या दोन काठ्या खरेदी केल्या. रोपवाटिकेच्या मालकाने विचारले, "रोपं नकोत का?" मग मी त्याला हे सामान मला का हवे होते हे मी सांगितले. तो खो खो हसला आणि माझे पैसे परत करत म्हणाला, "काम झालं की हे मला परत कर". त्याचे आभार मानून मी सरळ माझ्या फ्लॅटजवळच्या एका कमी रहदारी असलेल्या गल्लीत गेले, गाडी लावली, गाडीच्या लांबीवर 'खांब' लावले, आणि पॅरलल पार्किंगचा सराव करू लागले. एकदोनदा गाडी कुंड्यांना खर्चटली पण गाडीला काही इजा झाली नाही. मी बराच वेळ माझ्याच तंद्रीत अगदी एकलव्यासारखा सराव करत होते आणि ह्या कामात इतकी मग्न झाले की आजूबाजूला काय चालले आहे इकडे माझे लक्ष गेले नाही. तासाभराने मी कंटाळले आणि गाडीची डिकी उघडून सगळं साहित्य आत ठेऊ लागले. माझी नजर सहज बाजूला गेली आणि मला एकदम झटकाच बसला. प्रत्येक घराच्या अंगणात मुलं उभी होती आणि शांतपणे माझ्याकडे पाहत होती. नजरेत 'काय हा बावळटपणा चालला आहे' असे भाव होते. कुणास ठाऊक मी कधी पासून त्यांचे मनोरंजन करत होते!

एका वर्षी भारतीय क्रिकेट टीम ऑस्ट्रेलियात आली होती. साहजिकच आम्ही सगळे भारतीय लोक त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेऊन होतो. एक दिवस कुणी तरी बातमी आणली की भारतीय टीम मायर्स डिपार्टमेंटल स्टोरमधे खरेदी करायला गेली होती आणि गंमत म्हणजे त्या सगळ्यांनी आपली खरेदी बार्गेन बेसमेंटमधे केली! काय! बार्गेन बेसमेंटमधे हे सगळे प्रसिद्ध लोक गेले होते! आपल्या देशाचा जरा जरी अभिमान असता तर ह्या लोकांनी कमीत कमी किमतीच्या वस्तू खरेदी केल्या नसत्या! आधी आम्हाला खरेच वाटेना. आम्ही बार्गेन बेसमेंटमधे खरेदी करायचो कारण

आमचा पगार फार कमी होता आणि 'डॉलर वाचवायचे' हे आमचे ध्येय होते. पण ह्या लोकांना खूप पैसे मिळायचे; अगदी आमच्या कल्पनेबाहेर ह्यांची कमाई होती आणि तरी सुद्धा बार्गेन बेसमेंट? एक जण म्हणाला, "शेवटी भारतीय ते भारतीयच! ऑस्ट्रेलियात येऊन जास्तीत जास्त काय खरेदी करतील तर बार्गेन बेसमेंटमधल्या पाच डॉलरच्या चड्ड्या!" ही जरा अतिशयोक्ती होती पण ह्या विचाराने मनाला जरा बरे वाटले! पुढे मी कर्नाटक संघाच्या उगादीच्या समारंभाला गेले होते तिथे मला किरमाणीला भेटण्याची संधी मिळाली पण मी त्याला दुरूनच पाहिले. तोपर्यंत त्याची क्रिकेटची कारकीर्द संपली होती. आईला जेव्हा मी हे सांगितले तेव्हा ती मला म्हणाली, "हा काय बावळटपणा? एवढा मोठा खेळाडू अनायसे

तुझ्या समोर आला आणि तू त्याला भेटली नाहीस?"

मेलबर्नमधे चॅपल स्ट्रीट नावाचा एक प्रसिद्ध रस्ता आहे. तिथे लोक खायला-प्यायला आणि खरेदी करायला येतात. एका शनिवारी राकेश, कुणाल, आणि मी चॅपल स्ट्रीटवर हिंडायला गेलो. संध्याकाळी जेवायला एक रेस्टराँटमधे गेलो, वेटरने टेबल दाखवले आणि आम्ही स्थानापन्न होतोय तेव्हढ्यात राकेश बारीक आवाजात म्हणाला, "उजवीकडे पहा". रेस्टराँटमधे अजून इतकी गर्दी नव्हती. आणखी एकच टेबल वापरात होते. तिथे तीन पुरुष बिअर पीत जेवणाची वाट बघत होते. आमच्या नजरा तिकडे वळल्या आणि कुणालच्या आणि माझ्या टाळक्यात एकदम प्रकाश पडला - अरे, हा विजय अमृतराज तर नाही? सगळ्यांचं मत झालं की हा नक्कीच विजय अमृतराज आहे. कुणाल म्हणाला, "मी त्याला जाऊन भेटतो. येणार का माझ्याबरोबर?" राकेशनं आणि मी नकारात्मक माना हलवल्या. "तो बिचारा शांतपणे आपल्या मित्रांबरोबर गप्पा मारतो आहे. का त्याला त्रास द्या?" राकेश म्हणाला. मी म्हणाले, "त्याला राग आला तर? त्याचे चाहते त्याला सगळीकडे सही मागून आणि बोलण्याचा प्रयत्न करून भंडावून सोडत असतील. आणि तो जरा शिष्ठ दिसतोय. मी नाही बाई बोलण्याचा प्रयत्न करून आपला अपमान करून घेणार!" पण कुणालने काही ऐकले नाही आणि अमृतराजच्या टेबलाजवळ गेला. अमृतराजनं त्याच्याकडे एक तिरस्कारात्मक कटाक्ष टाकला आणि बिअर पीत राहिला. कुणाल बोलत राहिला पण अमृतराजनं त्याच्या बोलण्याकडे फारसे लक्ष दिले नाही. राकेश आणि मी दुरूनच हे नाट्य पाहत होतो. काही क्षणानंतर अमृतराजनं एक कटाक्ष आमच्याकडे टाकला आणि आमची नजरभेट होताच मला मेल्याहून मेल्यासारखं झालं. मी पटकन माझी नजर वळवली. कुणालही शेपूट घालून परत आला. बिचारा! कुणालचं नक्कीच चुकलं होतं पण अमृतराजनं तरी मनाचा थोडा मोठेपणा दाखवून कुणालची ओळख करून घ्यायला नको होती का? राकेश आणि मी अर्थातच कुणालला 'तरी आम्ही सांगत होतो' असे म्हणालो.

माझ्या आयुष्यातला सगळ्यात आनंदाचा काळ म्हणजे जेव्हा आईबाबा मेलबर्नला मला भेटायला आले तेव्हाचा होता. अखेर माझ्या घरात माझी माणसं माझ्या बरोबर राहत होती! घराला घरपण आलं होतं. जेवायला, फिरायला साहचर्य होतं. रोज काही नवीन पदार्थ केला जात होता. रात्री झोपताना सगळी दारं बंद केली का नाही अशी हुरहूर लागत नव्हती. बाबा तर आपल्या मुलीनं स्वतःच्या हिमतीवर उभं केलेलं तिचं लहानसं विश्व पाहून खूप खूष होते. त्यांना प्रत्येक नवीन गोष्टीत रस होता. आईला दम्याचा त्रास होत होता तरी ती प्रेक्षणीय स्थळं पाहायला येत होती. बाबा आणि मी आईची खूप काळजी घेत होतो. डायमारू नावाच्या एका जपानी डिपार्टमेंटल स्टोरचं उदघाटन पाहायला काही मित्रांनी खूप आग्रह केला म्हणून आई आणि बाबा थंडीत रात्री बाहेर पडायला तयार झाले. दुसऱ्या दिवशी हेदरने मला फोन केला, "काय गं, तुला माहित आहे की तू द एजच्या आजच्या अंकाच्या पहिल्या पानावर आहेस?" मी पटकन हे वृत्तपत्र खरेदी केलं आणि खरंच आमचा डायमारुत प्रवेश करतानाच मोठा फोटो होता! हे दुकान जपानी असल्यामुळे त्याच्या उदघाटनाची जरा जास्तच गवगवा झाला होता!

रॉयल बोटॅनिकल गार्डन मधे चालून चालून आईबाबा थकले आणि एका उंचवट्यावर असलेल्या मनोऱ्याखाली जाऊन बसले. मी पटकन फोटो काढला आणि नंतर फोटोची प्रिंट पाह्यलावर आम्ही हसू लागलो कारण फोटोत दोघे एकमेकांकडे पाठ करून बसले आहेत आणि चेहऱ्यावर असे भाव आहेत की जणू काही दोघं तरुण आहेत आणि एकमेकांशी भांडण करून तोंड फुगवून बसले आहेत असं वाटावं. हा फोटो माझ्या अगदी जिवाभावाचा आहे. तेवढीच एक आठवण! त्यांचा परत जायचा दिवस उजाडला आणि माझे आणि आईचे अश्रू थांबेनात. विमानतळावर काढलेला शेवटचा फोटो पहिला की आजही माझे डोळे भरून येतात.



# गाथा smiley ची

- रेवा मुळे

'या विषयावर जास्त जाणून घेण्याविषयी रस निर्माण झाला तो  मराठी आंतरजालावरील विविध स्मायलींचा मुक्त वापर पाहून.

'स्मायली' बहुतकरून एका हसणाऱ्या मानवी चेहऱ्याला संबोधले जाते जसे :-) . स्मायलीची संकल्पना साधारण १९४८ साली प्रदर्शित झालेल्या एका चित्रपटातून झाली. पोर्ट ऑफ कॉल ह्या सिनेमातील एका दृश्यात दु:खी नायिका लिपस्टकच्या साह्याने एक चेहरा आरशावर चितारते. त्या चेहऱ्यावरील भाव उदास असून नाकासाठी एक टिंब योजला आहे. त्यानंतर त्या स्वरूपाचे काही आनंदी चेहरे १९५३ आणि १९५८ साली निर्माण केलेल्या काही सिनेमांच्या जाहिरातींसाठी वापरले. त्यापैकी एका सिनेमाचे पोस्टर.

http://upload.wikimedia.org/wikipedia/commons/d/d0/NYHT_Smiley_10th_March_1953.jpg

प्रचलित स्वरूपातील स्मायली प्रथम १९६२ साली न्यूयॉर्क येथील WMCA या रेडियो केंद्राने एक अभिनव कल्पनेद्वारे वापरली. या केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या एका लोकप्रिय कार्यक्रमादरम्यान श्रोत्यांना फोन करून त्यांच्याशी गप्पा मारल्या जात. नंतर त्यांना भेट म्हणून एक स्वेटर पाठवले जात असे व त्यावर आनंदी चेहऱ्याची स्मायली चितारलेली असे.

https://i.ebayimg.com/images/g/IvoAAOSwmIxfFsQf/s-l400.jpg

त्यानंतर १९६३ साली State Mutual Life Assurrance Company Massachusetts ह्या कंपनीने हार्वे बॉल ह्या कलाकाराला आनंदी स्मायलींचे डिझाइन काढायचे काम दिले. प्रयोजन हे की त्या कंपनीच्या कामगारांचे मनोबल वाढावे. बॉल ह्याने हे डिझाइन केवळ १० मिनिटात काढले आणि त्याचे त्याला ४५ डॉलर्स मिळाले.

गर्द पिवळ्या रंगाची पार्श्वभूमीवर अंडाकृती डोळे आणि चंद्राकृती हास्य ह्या स्वरूपातील ५० मिलियन पेक्षा जास्त बटन्स छापले गेले. हे डिझाइन जरी वर उल्लेख केलेल्या डिझाइनशी मिळते जुळते असले तरी बॉल चे डिझाइन जास्त प्रसिद्ध झाले. सियाटलस्थित जॉर्ज तेनागी ह्याने एका जाहिरात साठी स्मायली चे आपले एक डिझाइन काढले. ते University Federal Savings & Loan च्या जाहिरातीसाठी वापरले गेले. पुढे जाऊन १९९३ साली या जाहिरातीतील स्मायलीचा उपयोग तिच्या निर्मात्याने स्वतःचा सियाटल येथील महापौर पदाच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी उपयोग केला.

१९७० साली फिलाडेल्फिया येथील बर्नार्ड आणि मुरे स्पेन बंधूंनी स्मायली छापून बटन्स, कॉफी मग, टी शर्ट इत्यादी "Have a happy day"ह्या घोष वाक्यासह छापले. १९७२ साली त्यांनी या बटणाच्या अनेक प्रती छापल्या. १९७२ सालीच Franklin Loufrani ह्यांनी प्रथम स्मायलीचे ट्रेडमार्क करून घेतले. त्याने आपल्या वर्तमानपत्रातील चांगल्या बातम्या अधोरेखित करण्यासाठी स्मायलींचा उपयोग केला. त्यानंतर त्याने 'The Smiley Company' नावाची कंपनी चालू केली.

१९९६ साली Loufrani चा मुलगा निकोलस याने हि कंपनी चालवायला घेतली आणि कंपनीचा कारभार वाढवून तिचे रूपंतर एका बहुराष्ट्रीय कंपनीत केले. त्यावेळी बॉल ह्याने स्मायली चे प्रथम चित्र आपण निर्माण केल्याचा दावा केला. यावर निकोलसचे उत्तर असे होते की, जरी त्याच्या वडिलांनी वापरलेली स्मायली व बॉल यांनी निर्मिलेली स्मायली यांत बरेच साम्य असले तरी स्मायलीचे चित्र काढायला इतके सोपे आहे की त्यावर कुणी एक व्यक्ती आपला हक्क सांगू शकत नाही. पुराव्या दाखल त्याने त्याच्या संकेतस्थळावर फ्रान्स मध्ये असलेल्या काही अतिप्राचीन गुहांमधील चित्रांमध्ये स्मायलीची चित्र आहेत हे सांगितले आणि १९६० सालीही एका रेडियो केंद्राने स्मायलींचा उपयोग जाहिरातींसाठी केला होता असे नमूद केले.

युनायटेड किंगडम मध्ये स्मायलीच्या हसऱ्या चेहऱ्याचा उपयोग Windsor Free Festival मध्ये १९७० साली वापरले गेले. त्यानंतर त्याचा वापर१९८० साली झालेल्या electronic music and dance culture मध्ये झाला.

आता पाहूयात आपल्या सर्वांना परिचित असलेल्या स्मायलीचा वापर आंतरजालावर कसा सुरू झाला ते.

'१९ सप्टेंबर १९८२ रोजी Scott Falhman ह्या कार्नेगी विद्यापीठाशी निगडित असलेल्या व्यक्तीने प्रथम प्रस्ताव ठेवला. Online Message Board वरील विनोदी वाक्यांना ' :- ) ' स्मायली जोडावी. जेणेकरून ती वाक्ये बाकीच्या गंभीर स्वरूपाच्या वाक्यांपासून वेगळी ओळखू यावीत. स्मायलींचा जालीय वापरामुळे दृश्य स्वरूपातील भावनांची देवाणघेवाण सोपी झाली. Falhman याने पुढे ' :-(' ह्या चिन्हाचा वापर गंभीर स्वरुपाच्या लेखनासाठी करावा असेही सुचवले.
त्याच काळात आयबीएमने त्यांच्या नव्या पिढीतील पर्सनल कम्प्युटर्स आणि पुढे जाऊन मायक्रोसॉफ्टने विंडोज 95 नंतरच्या कीबोर्डच्या प्रोग्रॅम मध्ये स्मायली Special Characters म्हणून समाविष्ट केले.
उदा. Unicode smiley characters:
☺ U+263A Alt+1 White Smiling Face
☻ U+263B Alt+2 Black Smiling Face
☹ U+2639 White Frowning Face

जगभरातील १०० देशांमध्ये स्मायलींचा ट्रेडमार्क हा The Smiley Company कडे आहे. Smiley World Ltd ही या कंपनी ची उपषाखा आहे. तिचा मालक Nicolas Loufrani आहे. या स्मायली ब्रँड्स बऱ्याच क्षेत्रांमध्ये या कंपनीद्वारे वापरला जातो. जसे की- कपडे, घरगुती सजावट, परफ्यूम्स, स्टेशनरी इत्यादी.
१९९७ साली प्रथम Smiley Company ने स्मायलीचा अमेरिकेत ट्रेडमार्क घेण्याचा प्रयत्न केला ज्यात "smiley" हा शब्दप्रयोग देखिल होता. ह्यावेळी त्यांचे वॉलमार्ट ह्या कंपनीशी मतभेद झाले. कारण त्यावेळी वॉलमार्ट आपल्या जाहिराती मध्ये आनंदी चेहरा जवळजवळ वर्षभरा पासून वापरत होती. वॉलमार्ट ने सुरवातीला निकोलसच्या अर्जावर आक्षेप घेतला. त्यानंतर स्वतः स्मायलीचा चेहरा रजिस्टर करायचा प्रयत्न केला. शेवटी प्रकरण कोर्टात गेले व तिथे हा खटला जवळजवळ ७ वर्ष चालू राहिला. २०१० साली वॉलमार्ट आणि Smiley Company यांनी शिकागो येथे फेडरल कोर्टात आपला वाद मिटवला ज्याच्या अटी गुप्त ठेवण्यात आल्या आहेत.

स्मायलींना जालावर प्रसिद्ध करणारे विविध टुल्स व त्यांचा संग्रह
याहू मेसेंजर - यांच्या चिन्हातच स्मायलीचा कल्पक वापर केला गेला होता.
https://clipground.com/images/yahoo-messenger-logo-png-2.jpg
याहू मेसेंजर: http://i48.photobucket.com/albums/f220/jshrirangang/ymessenger_zps38dfef37.png
एम एस एन मेसेंजर : http://i48.photobucket.com/albums/f220/jshrirangang/msn_zpsbd52fd5f.png
गूगल हॅन्गआउट : https://trendblog.net/wp-content/uploads/2013/06/hangouts-emoticons-300x209.png
ब्लॅकबेरी मेसेंजर: http://i48.photobucket.com/albums/f220/jshrirangang/bbm_zps7ee1d80d.png

माहिती व चित्रे जालावरून व विकीवरून साभार.

# भावपूर्ण श्रद्धांजली

## सुभाष गोविंद जेजुरीकर




सुभाष गोविंद जेजुरीकर यांना मंगळवार २२ मार्च २०२२ रोजी देवाज्ञा झाली . त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. त्यांच्या मागे त्यांची पत्नी मीरा दोन मुले संदीप आणि समीर , सुना अरु आणि कॅरेन , नातवंडं सोफी , अजय , काई , अंजली , आणि जुलिअन असा परिवार आहे. देव त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो .



# आयुष्याचे व्हिटॅमिन L

- प्राजक्ता हेबळे

"प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं"

या कुसुमाग्रजांच्या ओळी किती थेट, उत्कट प्रेमाची उपमा देतात. खरंच प्रेमाची किती विविध रूपं आहेत. मातृ वात्सल्य हे सर्वात उच्च कोटी प्रेम ज्याची बरोबरी कशाशीही होऊ शकत नाही तर दुसरीकडे मुक्या जीवांवर केलेली ही भूतदया, ती देखील अतुलनीय आहे. 'प्रेम' हा अडीच अक्षरी शब्द असला तरी ती संपूर्ण जग व्यापून टाकणारी एक सर्वश्रेष्ठ भावना आहे. प्रेम ही एक अशी शाश्वत शक्ती आहे ज्यावर जीवनाचे रहाटगाडगे अविरत सुरु राहते.

आजच्या आपल्या दैनंदिन आयुष्यात आपण बऱ्याच गोष्टींवर प्रेम करतो, अगदी नात्यांपासून ते निर्जीव गोष्टीपर्यंत सर्व, काही अपेक्षा ठेवून तर काही निरपेक्ष. पण आपण स्वतःवर प्रेम करतो का किंवा केलंच तर कितपत करतो, की त्याला फारसे प्राधान्यच देत नाही? "मैं अपनी फेव्हरिट हूँ" - हे करीना कपूरचं 'जब वी मेट' चित्रपटातलं वाक्य आपल्या सगळ्यांना पाठ आहे, नाही का? प्रत्यक्षात मात्र चित्र वेगळंच दिसतं, आपल्याला स्वतःबद्दल तक्रारी असतात किंवा स्वतःकडून खूप अपेक्षा असतात आणि त्या पूर्ण नाही झाल्या की निराशा पदरात येते.

आपल्या सगळ्यांमध्ये काही ना काही उणीवा तर असतातच. ज्या वरकांनी दिसतात अशा शारीरिक कमतरता लपवण्यासाठी आपण सतत धडपड करतो. पण त्या बाह्य सौंदर्याच्या आत दडलेल्या आंतरिक मनाचा वेध, घेतो का आपण?

आपल्या त्रुटींसहित आपण स्वतःचा स्वीकार केला पाहिजे. इतरांनी आपल्याला समाविष्ट करून घ्यावं म्हणून आपण लोकांना आवडेल तसं वागायला जातो, अगदी आपल्या मनाविरुद्ध असलं तरी ही, परिणाम ती सल मनात खात राहते. आपलं वैविध्य आपणच जपलं पाहिजे नाही का, तर खरी गंमत आहे जगण्यात :) आपण जसे आहोत तसेच इतरांसमोर वागायला हवं नाहीतर उगीचच 'खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे' असं करू नये.

हे आपलं स्वयं प्रेम रुजण्यासाठी माती रुपी परिपूर्ण आहार व नियमित व्यायाम जसा गरजेचा तितकंच ते बहरण्यासाठी मानसिक, भावनिक आणि अध्यात्मिकतेचे खत पाणी ही अविभाज्य आहे !! आपण स्वतःसाठी वेळ दिला पाहिजे, एक सुंदर छंद जोपासायला किंवा आपली आवड जपण्यासाठी मग ती वाचन असो, लेखन असो, चांगले कार्यक्रम ऐकणे, इत्यादी. एखाद्याला रुचकर स्वयंपाक करून सगळ्यांना खाऊ घालण्यात ही खूप समाधान मिळते, करून तर बघा :)

आपलं मन आनंदी राहण्यासाठी चांगला विचार आणि त्यानुसार आचरण ठेवलंच पाहिजे. इतरांशी आपली तुलना करून निराश होण्यापेक्षा, आपली चढाओढ स्वतःशीच ठेवली तर, आपण अजून सक्षम होत जाऊ. ते म्हणतात ना निसर्ग चक्र निर्वीव्यात पणे चालत राहतं - चांगली कर्म केली तर चांगलीच फळं मिळतात. तुकाराम महाराजांनी सांगून ठेवलंच आहे ना 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी'. आपण कुणा व्यक्ती किंवा वस्तू वर निःस्वार्थ प्रेम केलं तर ते या ना त्या रूपात आपल्याला परतफेड म्हणून मिळतं देखील, अगदी त्याच व्यक्ती किंवा वस्तूतून नसलं तरी ही निराळ्या स्वरूपात. नक्की अनुभव घेऊन बघा, फक्त त्यासाठी आपण रिक्त हस्ताने आणि मोकळ्या दिलाने त्याचा स्वीकार करायला हवा. इतरांच्या गुणदोषांसकट त्यांना स्विकारलं तर आपलं मन विशाल होतंच पण स्वतःच्या नजरेत आपला मान अजून ही उंचावतो :)

चला तर मग मंडळी, या आपल्या नूतन वर्षा पासून एक संकल्प करूयात - कायम सकारात्मक राहू आणि उदंड प्रेम करू स्वतःवर आणि इतरांवरही कारण,

"या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे" !!


# मराठी शाळा


**- समीर पेणकर**


आपली शाळा आठवली कि आपल्या समोर मास्तर , खडू, पाटी, युनिफॉर्म चे चित्र उभे राहते. पण MAM च्या विद्यार्थ्यांना विचारलं तर ते सांगतील मराठी शाळा म्हणजे Zoom कॉल्स, Kahoot, online गेम्स आणी WhatsApp वर होमवर्क. अशी आहे आपल्या MAM ची शाळा.


MAM च्या मराठी शाळेत ६३ विद्यार्थी शिकत आहेत. ८ volunteer टीचर्स ह्या मुलांना दर आठवड्याला मराठी शिकवतात. सर्व मुलांच्या सहामाही परीक्षा घेतल्या गेल्या. त्यातले काही मुलांचे लिखाण आम्ही देत आहोत. तसेच BMM साठी मराठी शाळेतील मुलांचे एक convention समूहगीताचाहि सराव चालू आहे . आपले शिक्षक वर्षाअखेरीस पालक- शिक्षक भेटीची तयारी करत आहेत. पालकांचं प्रोत्साहन आणि घरी मराठी चा उपयोग हे अत्यंत महत्वाचे आहे. आपले शिक्षक पालकांबरोबर सतत WhatsApp किंवा Email द्वारे बोलत असतात.


आपल्या शाळेतल्या मुलांच्या लिखाणाचे एक फोटो कॉलाज खाली प्रस्तुत केले आहे.



सोहम महादडाळकर



अवनी रानडे



ईशा पिंगळे



सिद्धी कदम


अवंतिका गोसावी


अस्मि पाटील


आयुष साधले


विवान डोंगरे


श्रेयन पाटील



# MN-पुणे - स्नेहबंध

## -सौ. स्वामिनी जीवन बाबतीवाले

MN Parents Group Pune. MN-पुणे - स्नेहबंध मिनिआपोलिस येथील मुलांच्या पालकांचा पुणे येथील ग्रुप. हा ग्रुप ०१/१०/२०१७ रोजी श्री. उल्हास वैद्य, श्री मिलिंद वैद्य आणि श्री. विश्वास भागवत यांनी स्थापन केला. याचा उद्देश म्हणजे एकमेकांच्या संपर्कात रहाणे, मुले दूर आहेत म्हणून आपण एकटे रहायचे नाही. कोणी मिनियापोलिसला जाण्यासाठी ठरवत असेल तर जाताना आणि शक्य असल्यास येताना पण सोबत मिळते, कोणाची काही वस्तू मुलांना द्यायला किंवा आणायला सोयीचे होते. आमच्या या गटाची कल्पना मुलांना पण फार आवडली. मुलांचे-सुनांचे, मुलींचे-जावयांचे, नातवंडांचे यशस्वी षटकार तसेच त्यांचे विविध गुणदर्शन या गटामधे साजरे होतात. 'कसं काय' या आमच्या WhatsApp गटामध्ये सर्वांचे वाढदिवस साजरे केले जातात. सर्वांच्या वाढदिवसाची आमचे गटप्रमुख विश्वास भागवत यांनी एक दिनदर्शिका तयार केली आहे. त्यामुळे न चुकता त्यांच्याकडून मिळणाऱ्या वाढदिवसाच्या शुभेच्छा आनंद द्विगुणित करतात.

आमचा पहिला स्नेहमेळावा ६/१०/२०१७ रोजी सौ. व श्री. नांदगावकर यांच्या घरी आयोजित केला होता. दुसरा मेळावा सौ व श्री कुवळेकर यांच्या घरी साजरा झाला.त्यानंतर सौ व श्री भागवत यांच्या घरी त्यांनी व डॉ नवले आणि श्री मिलिंद वैद्य यांनी मिळून आयोजिलेल्या मेळाव्यात सर्वांची भेट झाली. तेव्हा महिला दिनाच्या निमित्ताने Princess of Bollywood हा मोहम्मद रफी यांच्या गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अशा स्नेहमेळाव्यात वरचेवर आम्ही भेटत असतो. वर्षातून एकदा किंवा दोनदा सहल आयोजित करण्यात येते. आता पर्यंत ४-५ एकदिवसीय सहली झाल्या आहेत. प्रथम २८/०१/२०१८ रोजी सौ व श्री दामले यांच्या मळवली येथील फार्म हाऊसवर गेलो होतो. सौ व श्री झांजे यांच्या रांजणगाव जवळील शेतावर सहल गेली होती. त्यानंतर घरकुल कृषी पर्यटन, वातुंडे, लवासा येथे गेलो होतो. नंतर जानेवारी महिन्यात सूरज हुरडा पार्टी, पारनेर येथे गेलो होतो. आता नुकतेच १३/०३/२०२२ ला नसरापूर ला गेलो होतो. या सर्व सहलींचे नेटके आयोजन श्री विश्वास भागवत आनंदाने करतात. मागील वर्षी आमच्या गटातील सदस्य श्री रामकृष्ण वैद्य व श्री हरीश झांजे यांचे दुःखद निधन झाले. गेल्या वर्षी श्री झांजे यांचे सुंदर चवीचे केशर आंबे अजूनही आम्ही विसरलो नाही. श्री विश्वास भागवत अधूनमधून सर्वांना फोनवर ख्यालीखुशाली विचारत असतात. आम्ही पण एकमेकांच्या घरी जाऊन भेटत असतो. आता सर्वांचे स्नेहबंध चांगले जुळून आले आहेत. लॉकडाउनच्या काळात हा गटच आमच्या भेटीचा आधार होता. तेव्हा आम्ही दोन-तीन वेळा झूम मिटींगद्वारे पण भेटलो. आता आम्ही सगळे मोबाईल, कंप्युटर इ नवीन पिढीची संपर्क साधने कुशलतेने हाताळत आहोत. अर्थात याचा आमच्या मुलांना पण आनंद आणि अभिमान आहे. या सोबतच आमचा मिनीआपोलिस मधील मुलांच्या आई मंडळींचा पण एक वेगळा कोजागिरी गट आहे. १२/०२/२०१८ रोजी सौ शोभा नांदगावकर, सौ माया आफळे, सौ स्नेहलता भागवत, सौ माधुरी वैद्य यांनी स्थापन केला. आमचे विविध गुणदर्शन रांगोळी, आपल्या बागेतील फुलांचे फोटो, पाककृती, हस्तकला, चित्रकला इ.इ. या गटात आम्ही शेअर करतो. सौ मेधा तेलंग यांचा 'शब्द झाले चांदण्यांचे' ही कवितासंग्रहाची सीडी प्रकशित झाली आहे. तसेच त्या यू ट्यूब वर पण active आहेत.

सौ ऋचा सावरकर पण फार छान कविता करतात. सौ स्वामिनी बाबतीवाले या प्राणिक हिलर आहेत. श्री विश्वास भागवत यांनी त्यांचे मित्र सुलेखनकार श्री सुबोध गोखले यांचा 'श्रीमद्भगवतगीता' हा हस्तलिखित ग्रंथ प्रकाशित केला आहे. तसेच सौ. माया रविंद्र आफळे यांनी संकलित केलेला 'सार्थ हरिपाठ' पण प्रकाशित झाला आहे. श्री. मोहन महाडदळकर उत्तम लेखक आहेत. त्यांचे बँकेतील नोकरी चे अनुभव सर्वांना मार्गदर्शक आहेत. त्यासंबंधीचे एक पुस्तक ते लवकरच प्रकाशित करणार आहेत. श्री.श्रीपाद जोशी हे सुध्दा उत्तम चित्रकार आहेत. श्री जीवन बाबतीवाले यांची चित्रकला, लेखन असे अनेक हरहुन्नरी सदस्य गटात कार्यरत आहेत. या लेखाचे शब्दांकन सौ स्वामिनी जीवन बाबतीवाले यांनी श्री विश्वास भागवत यांच्या सहकार्याने केले आहे. अशा या तनमनाने उत्साही असलेल्या गटाची यंदाची सहल नसरापूर जवळील वेल्हे येथील आस्कवाडी येथील, 'ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) द्वारे संचालित केंद्र' येथे गेली होती.
ती शब्दबध्द केलेली आहे खालील प्रमाणे.

चला गावाकडच्या घरी नमस्कार मंडळी बऱ्याच कालावधीनंतर आज आमच्या MN Parents group ची सहल नसरापूर जवळील वेल्हे येथील आस्कवाडी येथील ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) द्वारा संचालित केंद्र येथे गेली होती. श्री भागवत यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे गाडी तसेच सर्व सहभागी मंडळी वेळेवर आली. खूप दिवसांनी सर्व जण भेटल्यावर अतिशय आनंद झाला.

नारळ वाढवून, ग्रुप फोटोसेशन झाले आणि गाडी निघाली. प्रवासाच्या सुरवातीला उगवतीच्या सूर्य नारायणाने दिलेले मनोहारी दर्शन फार सुखावून गेले. श्री भागवत यांनी लगेच त्यांना कॅमेरा बंद केले. जाताना श्री बनेश्वर येथील श्री शिवमंदिरात दर्शन घेऊन आम्ही तिथे पोचलो. बनेश्वर पासून या केंद्रातील सेविका सौ प्रिया ताई आणि सौ संगीता ताई आमच्या सोबत आल्यामुळे ठरलेल्या ठिकाणी विनासायास पोहोचलो. हे एक गावाकड चे सुबक घर आहे.

पुढे ऐसपैस अंगण, नंतर पडवी, आतमध्ये माजघर, देवघर व कोठीची खोली आणि त्या पुढे स्वयंपाकघर. सर्वात पाठीमागे सुंदर परसबाग आहे, यामध्ये झेंडू तसेच लाल माठ, वांगी, टोमॅटो इ. रोपे वाऱ्यासोबत गुजगोष्टी करीत होती. फार आनंद वाटला ही परसबाग पाहून. बाजूला गोबरगॅस प्लांट पण आहे. या गॅसचा इंधन म्हणून योग्य वापर येथे होत आहे. हा बदल नक्कीच कौतुकास्पद आहे. तव्यावरून ताटलीत तांदुळाची धिरडी आणि खोबऱ्याची गरम चटणी असा चविष्ट नाश्ता झाला. आम्ही या चटणी ची रेसिपी पण विचारुन घेतलीनंतर आम्ही शेताच्या सफरीला निघालो. दूर दूर पर्यंत पसरलेले हिरवेगार शेत पाहून फार छान वाटले. दगडमातीच्या शेतजमिनी तून चालताना, आमच्या शहरी रस्त्यावरील मॉर्निंग वॉकचा कस लागला. या शेतात भुईमुग, तूर तसेच घेवडा, कांदा पात, मेथी, टोमॅटो इ. लागवड केलेली आहे तसेच मोहरी चे रोपही पाहिले. येताना स्ट्रॉबेरी पिकींग साठी गेलो. मनसोक्त स्ट्रॉबेरी पिकींग आणि चवीचा आनंद घेतला. शेतातून परत येताना कांदा पात आणि स्ट्रॉबेरी चा भरपूर वानवळा मिळाला.

आल्यावर घरात स्वयंपाकाचा घमघमाट सुटला होता. थोड्याच वेळात आम्ही जेवायला बसलो. प्रासादिक खीर, गरम भाकरी- पिठलं, भरलं वांगं, मेथीची भाजी, पापड लोणचे आणि मटार भात-ताक असा झकास मेनू होता. भरपूर चालून आल्यामुळे सपाटून भूक लागली होती. आपण आताच पाहिलेल्या शेतातील ताजा ताजा भाजीपाला ताटात पाहून स्वादिष्ट जेवणाची लज्जत अजून वाढली. जेवणानंतर डॉ शुभदा साने यांच्या चिठ्ठ्यांच्या खेळाने बहार आली. आमच्या सामान्य ज्ञानात भर पडली. यानंतर सौ संगीता ताई व सौ प्रिया ताईंनी, करोना काळात अंगणवाडी सेविका म्हणून गावात केलेल्या कामाची माहिती दिली. ते ऐकून अशा दुर्गम भागात ज्ञानप्रबोधिनीचे आणि त्यांचे समाजसेवेचे कार्य सक्षमतेने करणारे असे अनेक कार्यकर्ते यांचे कौतुक वाटते. या सर्वांचे हार्दिक अभिनंदन आणि खूप शुभेच्छा. आता येथून निरोपाचा चहा घेऊन आणि बाहेर विक्री साठी ठेवलेली शेतातील ताजी भाजी घेऊन आम्ही निघालो. नसरापूर ला ज्ञानप्रबोधिनी च्या बचतगटातील महिलांनी केलेल्या गृहोपयोगी वस्तू आणि पिठे, वाळवणाचे पदार्थ यांचे विक्री केंद्र आहे. ते पाहिले, काही खरेदी केली आणि पुण्याकडे प्रस्थान केले. परतीच्या प्रवासात हमरस्त्यावरील खाऊ गल्ली मध्ये सर्वांनी मस्त आंबा आईस्क्रीम चा आस्वाद घेतला आणि सहल समाप्ती चा बिगुल वाजला. आता गाडीने पुणे रस्त्यावर वळण घेतले. सर्वांची मने समाधानाने आणि पिशव्या भाजीने भरून गेल्या होत्या. पुढील सहलीतील सहभागाचे आश्वासन देऊन एक एक जण नियोजित स्थळी उतरले.





# मेथांबा

-अमोल दांडेकर

ऑफ़िस मधे लंच करताना डब्यात अचानक मेथांबा मिळतो, पहिल्या घासात टाइम ट्रॅव्हल होतं वीस पंचवीस वर्ष मागे जातो. खिडकीतून येणारा सुर्प्रकाश 45C चा भासतो. ऊन्हाची रण रण, तापलेली फर्शी आठवते. आज मेथांबा जुन्या आठवणीत घेऊन जातो आणि पक्वान्ना पेक्षा श्रेष्ठ जाणवतो...

बाहेर पेटलेले असताना, भाज्यांना चव नसताना, कुण्या एका चतुर पाक कला तज्ञाने मेथांबा नावाच्या पदार्थाचा शोध लावला आणि समस्त महिला वर्गाने सुटकेचा श्वास सोडला. आता मेथांबा आणि त्याची चव ही घरा घरा प्रमाणे बदलत जाते. अजूनतरी इथे वारणा सर्टिफाइड, चितळे सर्टिफाइड. किंवा ISO9001 अथवा दीक्षित-दिवेकर यांचा शिरकाव झालेला नाही. झाला तरी अस्सल खवैय्या समोर सर्टिफाइड ठेवला तरच तो खाईल असे नाही त्यामुळे सर्टिफाइड असो किंवा नसो, समोर आला की तो मेथांबा खाणार. फक्त हा आजीनं, तो आईनं आणि तो शेजारच्या काकुंकडला इतपत साधारण वय वर्ष १० ला ही कळत. मेथांब्याची फरमाईश ही खाणाऱ्या पेक्षा खिलवणाऱ्याची अधिक असते कारण रोज, करू काय? या यक्ष प्रश्नाचं उत्तर ती उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असं वर्षभर चारी ठाव शोधत असते. कैऱ्यांचा मौसम सुरु झाला की पहिल्यांदा होतो तो मेथांबा, मग पन्ह. उन्हाळा संपून पावसाळ्याची चाहूल लागली की आमच्या पिढीच्या आयांना काळजी असायची ती लोणचं आणि मोरंब्याची. तेव्हा 'Mother's' ची सोय नव्हती, 'बेडेकर' वगैरे असले तरी Motherला ते पटत नसे. आजच्या आईला तर वेळच नसतो त्यामुळे ती पटकन एक Mother's घेते आणि समाधान मानते. पण जुन्या वळणाची माणसं, त्यांच्या ते इतकं अंगवळणी पडलं असत की ४ महिने परदेशात मुलाकडे/मुलीकडे जाणारी आई बाजरात चांगली कैरी दिसली की लोणच्याचा घाट घालते. मी दिवसभर करू काय? त्यापेक्षा माझा वेळ जाईल असं करत अस्सल Mother's करून जाते.

उन्हाळ्याच्या काहिलीत मेथी दाणा थंड म्हणून तो गरम पडत नाही, आता मेथाम्बा healthy की नाही यात मी शिरत नाही. पण आपल भारतीय अन्न ज्यांनी डिझाईन केलं त्यांची कमाल आहे. तो मेथांबा बरोब्बर वातावरण गरम असतानाच खावासा वाटतो. आता आमच्या कडला मेथांबा इतरानी खाल्ला की ते "अबे मेथांबा आहे का मोरंबा? असं म्हणतात!" म्हणून म्हंटल त्याची चव घरा घरा प्रमाणे बदलत जाते. मागे एक दोन वर्ष पलिकडली गोष्ट cranberry cranberry (करवंदाचा भाऊ समजा) करत खूप घेतल्या आणि दोनच्या वर घशाखाली जाईना. मग बायकोनं शक्कल लढवली. रात्री एकदिवस जेवणात एक लाल बुंद जेली सारखं दिसणार पानात वाढलेलं म्हणाली खाऊन बघ. मी ते खाऊन पाहिलं त्याची चव एकदम मेथांब्यासारखी, मग बायको म्हणाली अरे cranberryच कल्याण केलं! मी म्हंटल खूपच सही झाल आहे. ती cranberry म्हणजे multinational company मधे काम करणारी Natalie एकदम कुंकू लावलेली नितुच झाली! पण बायको म्हणाली “जपून खा भरपूर साखर घातली आहे त्यात”. उन्हाळ्यात मेथांबा संपला की जेवण जात नसे specially जेवण झाल्यावर दोन थेम्ब पानात घेऊन त्याची चव जिभेवर ठेऊन जेवण संपवायचं की सायकलला टांग मारून दिवसभर हुंदडायला मोकळे.

शेवट आज जेवण संपता संपता एक विचार आला की या अन्नाचं त्या ऋतूशी नातं असत, त्या मातीशी नातं असतं. पुरणाची पोळी म्हंटल की हमखास गौरी-गणपती किंवा होळी आठवते. गुळाची पोळी संक्रांत आणि पतंगीची आठवण करून देते. अमेरिकेत आम्ही उन्हाळ्याची वाट पाहातो आहोत अन तो आम्हाला हूल देतो आहे. उन्हाळ्याची आठवण करून देणारा मेथांबा मात्र असाच भूतकाळात घेऊन जातो आणि मन नागपुरात जाऊन पोचतं!



Chitra Antarjalavarun sabhar



# ही सुरेखाSSS...

-गौरी सागावकर देशमुख

त्यांनी पहिल्याच भेटीत मला हक्कानं "गौरेSS.." म्हटलं आणि तिथंच, "या मग उद्यापासून", असं म्हणत विश्वासानं मी घराची एक चावी त्यांच्या हातावर ठेवली! त्या माझ्या 'सुरेखा मावशी' होत्या फक्त! त्यांच्या अपरोक्ष सुध्दा 'कामवाली बाई' वगैरे म्हणायचं धाडस झालंच नाही माझं!

त्यांचं वय माझ्या ममा एवढंच साधारण. कपाळावर अंडगोल टिकलीही तिच्यासारखीच! तिथंच कनेक्ट झालेले मी त्यांच्याशी!चांगलं ऐंशी किलोचं दणकट व्यक्तिमत्त्व! आवाज पण ऐंशी किलोचाच! त्या पार्किंगमध्ये असतानाच मला तिसऱ्या मजल्यावर कळायचं की सुरेखा मावशी येताहेत! जिन्यावरून येणाऱ्याजाणाऱ्या माणसांशी बोलत , पोरांना झापत निवांSSSत यायच्या मावशी! तसा दराराच होता त्यांचा सोसायटीत! कधी मला 'चव बघायला' आणलेल्या पदार्थाची पुडी हातात असायची. भांडी-कपडे-फरशी करत जवळ जवळ दोन-अडीच तास अखंड गप्पा मारायच्या. सासू, नणंद, नवरा...असं झालं तसं झालं, सांगत डोळे पुसत मोकळ्या व्हायच्या..तर कधी खळखळून हासायच्या! मला त्यांचं खानदान पाठ झालं होतं! आंबेगावात दोन मजली टुमदार घर त्यांचं स्वतःचं! पण आली वेळ काय करणार?

'तुम्ही "आजी" होणारय' असं मी सांगितलं तेव्हा इतक्या खुश झालेल्या की बस्स! मी उलट्यांनी बेजार होते तेव्हा. त्या आल्या की आधी विचारायच्या, "खाल्लंस का"? मी "नाही" म्हटलं की, थोड्याच वेळात मावशींच्या हातची गरमागरम कांदाभजी, थालिपीठ, शेंगोळ्या असलं काहीतरी चमचमीत खाऊन पोटातला माझा बिल्लूडा खुश व्हायचा!

तीन महिन्याच्या बिल्लूला घेऊन मी परत माहेरहून पुण्याला आले. मावशी कामाला आल्या की आधी बिल्लूच्या बाजूला आडव्या व्हायच्या.. मग नातू आणि आजी मनसोक्त लोळणार.. खिदळणार.. बडबडणार...'ढीमपांग ढिपांग ढीम' असा तोंडानं ढोल वाजवत त्याला पोटावर उभं पकडून घरभर नाचायच्या मावशी! बिनधास्त! कधी जत्रेला गेल्या तर त्याला खुळखुळा आणतील.. मधूनच वाटलं म्हणून माझ्या हातावर पैसे देत सांगतील त्याला चांगला ड्रेस घे..(मोठं मन हा खूप छोटा शब्द आहे त्यांच्यासाठी!) गुढीपाडव्याला तर साखरेची माळ त्याच्या गळ्यात घालत म्हणाल्या होत्या, "पहिला नातू आहे माझा! आज्जीनंच करायचे असतात नातवाचे सगळे सण!" त्याच्यासाठी रोज लेमन गोळ्या आणायच्या..त्या खाऊन दोघांचीही तोंडं, कपडे चिकट केशरी झालेले असायचे.. मी म्हणायचे, 'नका न आणत जाऊ'..तर मलाच ओरडायच्या, "तू गप! माझ्या बिल्लूला आवडतं!" मग गपगुमान बिल्लूला दुसऱ्यांदा अंघोळ घालण्याशिवाय पर्याय नसायचा! एकदातर 'शेजाऱ्यांनी आठवडा झाला झंडूबाम नेलाय', असं मी सांगितल्यावर, हातातलं काम सोडून, मी नको नको म्हणत असताना त्या तडक शेजारीणीकडं गेल्या आणि आवाज टाकला,"गौरीचा झंडूबाम घेतलायस का? आत्ता परत दे!" बाटली घेऊन विजयी होऊनच परत!

त्यांच्या मुलाचं लग्न होतं. महिनाभर आधीच माझ्या हातात साडी देत म्हणाल्या, "तुला छान दिसेल म्हणून मुद्दाम वेगळी घेतलीये तुझ्यासाठी. ब्लाउज स्लीवलेस शिव. भारी दिसेल तुला!" सुखद धक्का होता हा माझ्यासाठी! ती साडी कसली आणि केवढ्याची? याच्याशी मला शून्य मतलब! त्याची किंमत पैशात नाही होणार! मी शिवला स्लीवलेस ब्लाउज आणि घेऊन आलेय येताना! तीच ही फोटोतली साडी.

माझ्या घरात देव्हारा नसणं, मी लग्न झालेल्या टिपिकल बायकांसारखी न राहणं असल्या गोष्टी कधीच आड येऊ दिल्या नाहीत त्यांनी आमच्या नात्यात (तेवढा अधिकार असूनही) की कधी स्वतःची मतं पटवून द्यायचा प्रयत्नही केला नाही.(मला भेटलेली माणसं हे आधी करतात! पण मावशी एकमेव अपवाद!) आपल्याला 'हे' पटतं तर तिला 'ते' पटतं! इतका साधा आणि स्पष्ट विचार करून जवळ केलं होतं त्यांनी मला!

इथं आल्यापासून सगळ्यात जास्त कुणाला मिस केलं असेल तर मावशींनाच! कट्टा पुसायचा, बाथरूम घासायचा कंटाळा आला तर 'करतील ना मावशी,' असं नाही विसंबून चालत आता..सात महिन्याच्या बिल्लूला मावशींच्या घरी सोडून निर्धास्तपणे पिक्चर बघायला गेलेलो, तसं नाही जाता आलं दोन वर्षात कुठं. सकाळी 10 ते 12 या वेळेत तेवढी बडबड आणि हासणंही होत नाही आता...पण सुरेखा मावशींच्या फोन ची सुरवात मात्र अजूनही, "गौरेSS बोल" नं च होते!!♥

# Semantics

**- अंजिरा मानकर**

I am a person of language
Care not for syntax of things
But for words of true meanings
True to its essence
No hypocrite nonsense
Words have power
Whether true or false
Like the mantra
Of sound energy
They are causes or seeds
Of good or bad deeds
They add to the law of Karma indeed
Watch your words
Control your tongue
To prevent the harm
That will be done
Words of comfort will create peace
Putting addressee at ease
There is already life's suffering
For you and me

Then why will you cause
My limbs' trembling?
If you cause me hurt-ache
It will make your heart shake
Our limbs' trembling
Will vibrate the surrounding

Words will change into syllables
Syllables into sounds
Sounds into noise
Reason's ruin
Human's doing
Chaotic commotion
Final annihilation
Caused by
Human's own invention
Irrational humanism
Beyond reason

-10-28-2021



Tom Oye Award
The Edina Human Rights & Relations Commission honors
Sayali Amarapurkar
&
AshaUSA
In appreciation for promoting human relations and advancing human rights.
December 7, 2021
Human Rights & Relations Commission


# यशस्तुती

**- सायली अमरापूरकर**

मराठी मंडळाला तुमच्यावर गर्व आहे





# अभिनंदन

## आपले सदस्य डॉ. मिलिंद सोहोनी यांची वायझाटा स्कूल बोर्डाचे सदस्य म्हणून निवड

वायझाटा स्कूल बोर्डावरील तीन जागांसाठी गेल्या नोव्हेंबरमधे निवडणूक पार पडली. या तीन जागांसाठी एकूण १२ उमेदवार उभे होते. प्रचारादरम्यान त्यांचा भर स्कूल बोर्डासंबंधी त्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या मुद्द्यांवर होता. आपल्या मंडळाचे सदस्य डॉ. मिलिंद सोहोनी हे देखील या १२ पैकी एक उमेदवार होते. मिलिंद या निवडणूकीत प्रथमच उभे होते. पहिल्या तीन क्रमांकाची मते मिळवणाऱ्या इतर दोन उमेदवारांसह ते या निवडणूकीत विजयी झाले. जानेवारी २०२२ पासून सुरु झालेला त्यांच्या कार्यकाळ पुढील चार वर्षे चालेल.

वायझाटा स्कूल डिस्ट्रीक्टमधे ८ शहरांचा समावेश होतो. त्यापैकी काही पूर्णपणे तर काही अंशत: समाविष्ट आहेत. प्लिमथ, मेपल ग्रोव्ह, ओरोनो, वायझाटा, मेडिसिन लेक, मेडायना व कोर्कोरन ही ती शहरे आहेत. स्कूल बोर्डात निवडणीत विजयी होऊन सामील झालेले ७ डायरेक्टर्स असतात. प्रत्येकाचा कार्यकाळ चार वर्षांचा असतो. या निवडणुका एक वर्षाआड घेतल्या जातात. एकदा ४ जागांसाठी व एकदा ३ जागांसाठी. बोर्डाचे सदस्य म्हणून या सातही जणांनी एकत्रितपणे काम करून बोर्डाचे धोरण निश्चित करण्याची जबाबदारी पार पाडायची असते. त्याखेरीज अर्थसंकल्पीय अंमलबजावणी, मनुष्यबळ, अभ्यासक्रम व पायाभूत सुविधांची देखरेख करणे या जबाबदाऱ्यांचीही पूर्तता करायची असते. याखेरीज डिस्क्ट्रिक्टमधल्या विविध शाळांच्या बोर्डांच्या सदस्यांचीही विविध विषयांवरील समित्यांवर नियुक्ती होत असते.

मिलिंद हे शिक्षणानिमित्त भारतातून अमेरिकेत आले व गेल्या २६ वर्षांपासून त्यांचे वास्तव्य वायझाटा स्कूल डिस्ट्रीक्टच्या भागात आहे. त्यांनी त्यांच्या व्यावसायिक कारकीर्दीत निवृत्त होण्यापूर्वी वैज्ञानिक, बिझनेस डेवलपमेंट मॅनेजर व उद्योजक म्हणून काम केले आहे. त्यांना दोन अपत्यं आहेत. दोन्हीही वायझाटा स्कूल डिस्ट्रिक्टमधून शिकली आहेत व शिक्षण क्षेत्रात वंचित विद्यार्थ्यांसाठी कार्यरत आहेत.

वायझाटा स्कूल डिस्ट्रिक्टच्या विद्यार्थ्यांमधे २०% संख्या ही आशियाई मूळ असलेल्या विद्यार्थ्यांची आहे. मिलिंद यांच्या मते या गटाचे प्रतिनिधित्व स्कूल बोर्डावर होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या स्कूल डिस्ट्रिक्टच्या बोर्डावर निवड होणाऱ्या पहिल्या भारतीय अन पहिल्या आशियाई मूळ असलेल्या व्यक्तिचा मान मिलिंद यांना मिळाला आहे.

मिलिंद यांचे मनोगत:

"माझ्या व्यावसायिक कारकिर्दीत संशोधन, बिझनेस डेवलपमेंट व लघु उद्योगाचे मालक म्हणून यशस्वी झाल्यावर मी समाजासाठी कार्य करण्याचे ठरवले आहे. विशेषकरुन गेल्या २६ वर्षांत मला व माझ्या कुटूंबाला समाजाकडून जे काही मिळाले त्याची परतफेड करण्यासाठी पब्लिक सर्विस हे माध्यम मी निवडले आहे. या क्षेत्रातला माझा प्रवेश स्थानिक भारतीयांच्या सहभागाची सुरुवात ठरो व तो पुढे वृद्धींगत होत राहो अशी माझी सदिच्छा आहे. या क्षेत्रात सामील होण्याची इच्छा असणाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मी सदैव उत्सुक आहे. अमेरिकेतल्या पब्लिक सर्विसमधे भारतीयांच्या लक्षणीय सहभागाची हीच उत्तम वेळ आहे. आपण सगळे एकत्र येऊन समाजासाठी अन आपल्याला सामावून घेणाऱ्या या देशासाठी बरेच काही करू शकतो. विशेषकरून एकेकट्याने जे शक्य होणार नाही ते एकत्र येऊन नक्की शक्य होऊ शकतं. सकारात्मक घडामोडी घडण्याची वाट पाहू नका, त्या घडवून आणा."

मिलिंद यांची प्रचार मोहीम खालील मुद्द्यांवर आधारीत होती.

> कोविड-१९ पॅनडेमिक मुळे होणारे शैक्षणिक व पटसंख्येच्या बाबतीतले नुकसान भरून काढणे

> स्कूल डिस्ट्रिक्टमधील विद्यार्थ्यांदरम्यान असणाऱ्या संधीचे संतुलन साधणे

> अपंग विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या आर्थिक तरतुदींमधे वाढ करवून घेण्यासाठी राज्याच्या विधिमंडळ सदस्यांकडे पाठपुरावा करणे.


या निवडणूकीनिमित्त मराठी मंडळींकडून मिळालेल्या पाठिंब्यासाठी मिलिंद कृतज्ञता व्यक्त करतात. आगामी काळात स्कूल डिस्ट्रिक्टमधल्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाच्या वाटचालीत अशाच पाठिंब्याची अपेक्षा ते करतात. सातत्याने बदलत राहणाऱ्या जागतिक परिस्थितीच्या आव्हानाला वायझाटा स्कूल डिस्ट्रिक्टमधले विद्यार्थी यशस्वीपणे तोंड देऊ शकतील असा त्यांना विश्वास वाटतो.

मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा मिलिंद यांच्या या विजयाबद्दल आनंदीत आहे व पुढील चार वर्षांत मिलिंदबरोबर विद्यार्थ्यांच्या हितासाठी काम करण्यास उत्सुक आहे. यातून आपल्या इतर सदस्यांना सामाजिक कार्यासाठी प्रेरणा मिळेल असा विश्वास वाटतो.




# शब्दकोडे

- सायली अमरापूरकर-जहागिरदार
वर्षा कांडलीकर




आडवे शब्द:


१. कैवारी चित्रपटातील एक प्रेम गीत
४. ह्या मूठभर जागेत प्रेम साठलेलं असत, शरीराचा एक अवयव
६. बुद्धू, अशिक्षित
७. वीज कपात झाली तर उजेड पाडण्यासाठी ही हवीच घरात
९. आण , प्रतिज्ञा
१२. शंकराचे एक नाव, त्रिमूर्तीतील एक
१४. मदतीची हाक
१५. वडिलांचा भाऊ
१६. रुपवान (पुरुष), चांगला दिसणारा
१८. इसवी -- , इंग्लिशमधे मुलगा किंवा सूर्य
२०. आटोप, पसारा ---
२१. लोहाराच्या भट्टीला हवा पुरवण्यासाठी हा हवाच
२२. गळा, मंगळसूत्र घालायची जागा
२३. सर्वांचा आवडीचा दिवस
२४. ___ रे नाखवा; नाव किंवा होडी हाकणे
२५. -- गणेशा करणे ; एक शुभ अक्षर
२६. विनम्र, अत्यंत साधं, --- कन्या
२८. कीर्ती होणे, -- होणे
३०. एखाद्या वस्तूभोवती फिरण्याचा मार्ग
३२. हिंदीमध्ये '--- चौथ', विवाहित बायका किंवा विवाह उनमुक मुली ह्या दिवशी कडक उपवास करतात
३४. भारताचा राष्ट्रीय पक्षी
३५. मुंबईतले जिजामाता उद्यान
३८. चवथ्या नंतर येतो तो आकडा
४१. व्यक्ती आणि ..
४२. मंदिराचे शिखर
४३. आवाजातील प्रदीर्घ उच्चार, विशिष्ट ढंगाने बोलणे
४५. माणसाच्या मूलभूत गरजांपैकी प्रमुख
४६. साद
४९. सावंतवाडीची ही खेळणी प्रसिद्द आहेत
५१. दु:ख (उर्दू)
५३. एकाग्रचित्ती, खोलवर सहभाग
५५. लग्नकार्याचे दिवस
५६. बारीकसा ताप

आडवे उभे शब्द :

१. प्रियकराला प्रिय असते ती !
२. गणपतीचा आवडता रंग, प्रेमाचे प्रतीक म्हणून ह्या रंगाचे फुल देण्याची प्रथा आहे
३. माया, प्रेम, असलेली व्यक्ती
५. सीमा दव ह्या मराठी नायिकेचा पती
८. सबब
९. आसनाचा एक प्रकार
१०. अन्नाचे जिरणे
११. पक्षांचा समूह
१२. अ आ आई , म, म, --
१३. काव्यमय पद्य लेखन
१७. दुधाच्या चीकापासून केलेला एक गोड पदार्थ
१९. कायमची लक्षात राहणारी, विसरता न येणारी
२१. प्रेम ही एक उत्कट --- आहे , मुलीचे नाव
२२. नवरत्नांची ही जोडी
२७. सध्या कोविड प्रतिबंधक म्हणून सर्वांनीच ही टोचून घेणे फार जरुरीचं आहे
२९. श्रीरामाचा १४ वर्षांचा काळ
३१. मीठ
३२. हा हातात घेऊन करवली वधूवरांच्या मागे उभी असते
३३. वाणी, भाषा
३६. एका वर्षातील आठवड्यांची संख्या, पत्त्याच्या कॅट मधली पानांची संख्या
३७. घरापुढील छोटा रस्ता
३८. स्वयंपाक शास्त्रातील कौशल्य
३९. वेडेपणा, म्हातार -- लागणे
४०. मुलीचे लग्नापूर्वीचे घर
४४. भारत रत्न -- मंगेशकर
४५. मरण नसलेला, सुमधूर पेय
४७. वन
४८. निष्क्रिय बोलणे, -- मारणे
५०. मऊ च्या विरुद्ध ---
५२. एकाग्र, तल्लीन
५४. आकाश

# असा जन्म लाभावा देहाचा चंदन व्हावा
# गंध संपला तरी सुगंध दरवळत राहावा

## ईश्वर यांच्या आत्म्यास शांती देवो

................................ ................................

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ दी | पो | त्स | २ व | | | ३ हा | |
| प | | | ४ सु | ५ र | ६ वा | त | |
| ७ मा | मा | | ८ बा | स | री | | ९ बा |
| ळ | | १० हा | र | | | ११ रं | ग |
| | १२ न | | १३ स | १४ म | ई | | का |
| १५ व | र | | | हा | | १६ रा | म |
| १७ च | क | ली | | १८ मा | न | व | |
| १९ पा | च | | २० पा | री | | ण | |
| | २१ तु | ळ | स | | २२ क | | २३ पा |
| २४ म | र्द | | | २५ ध | ड | २६ प | ड |
| २७ रा | शी | २८ च | क्र | | २९ बो | ळ | वा |
| ठी | | व | | ३० क | ळ | स | |

## दिवाळी विशेष शब्दकोडे उत्तर

# मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा सांस्कृतिक कार्यक्रम

दीपोत्सव २०२१




संक्रांत २०२२

